रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २४६
www.ramprahar.com
◆ बुधवार, २५ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

लग्नाच्या भुलथापा देऊन विद्यार्थिनीवर अत्याचार/२
ज्येष्ठ नागरिकांना लुटणारे त्रिकुट जेरबंद/६
जेएनपीएमध्ये अखिल भारतीय बंदरांची कॅरम स्पर्धा/८

## संघर्षाचे समाधान संवादातूनच होऊ शकते -पीएम मोदी



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेनंतर मंगळवारी (दि.२४) राज्यसभेत इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका युद्ध तसेच पश्चिम आशियातील परिस्थितीवर भूमिका मांडली. भारताने नेहमीच संवादाचा मार्ग सुचवला असून सर्व संबंधित देशांशी भारत संपर्कात असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, कोणतेही युद्ध मानवतेच्या हिताचे नसते. सध्याच्या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला असून परिस्थितीतून सावरण्यासाठी वेळ लागेल. जर हा संघर्ष दीर्घकाळ चालला, तर त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. भारत परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. संघर्षाचे समाधान संवादातूनच होऊ शकते. भारत सातत्याने सर्व देशांना शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी प्रोत्साहित करत आहे.

# रायगडात ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक

### २०० रिक्त जागांसाठी होणार राजकीय संग्राम



**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींमधील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. २४४४ ग्रामपंचायतींमध्ये २८ एप्रिल रोजी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहेत. रायगड जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमध्ये २०० रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. या निवडणुकीत १७० सदस्य व ३० सरपंच निवडले जाणार आहेत.

राज्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य व थेट सरपंच यांचे निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्यातील २४४४ ग्रामपंचायतींमधील ४७१ थेट सरपंच आणि ३१२० सदस्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी २८ एप्रिल रोजी ही पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. महाड तालुक्यातील ३१, पोलादपूर १७, माणगाव १६, म्हसळा ११, श्रीवर्धन आठ, पेण सात, अलिबाग, मुरूड, सुधागड, तळा तालुक्यातील प्रत्येकी सहा, खालापूर पाच, कर्जत चार, तर पनवेल व रोहा तालुक्यातील प्रत्येकी दोन ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक होणार आहे.

३० मार्च रोजी पोटनिवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करण्यात येईल. ७ ते १३ एप्रिल या कालावधीत नामनिर्देशनपत्र दिली व स्वीकारली जातील. १५ एप्रिलला छाननी होईल. १७ एप्रिल रोजी अर्ज मागे घेता येतील. त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी जाहीर व चिन्हवाटप केले जाईल. आवश्यकता भासल्यास २८ एप्रिल रोजी मतदान आणि २९ एप्रिलला मतमोजणी होईल.

**पोटनिवडणूक होणाऱ्या रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायती**

अलिबाग-वैजाळी, रेवदंडा, कोप्रोली, नवेदर नवगाव, नागाव, खंडाळे; मुरूड-एकदरा, राजपुरी, चोरढे, काशीद, वेळास्ते, मांडला; पेण-कोपर, मुढाणी, वरवणे, वरसई, वाशिवली, सावरसई, पाटणोली; पनवेल-गिरवले, केळवणे; कर्जत-अंभेरपाडा, गौरकामत, दहिवली तर्फे वरेडी, पाली तर्फे कोथल खलाटी; खालापूर-गोरठण बुद्रूक, होराळे, जांबरूंग, खरीवली, जांभिवली; रोहा-पुई, न्हावे; सुधागड-चंदरगाव, शिलोशी, ताडगाव, माणगाव बुद्रुक, अडुळसे, नांदगाव; माणगाव-अंबर्ले, काकल, दहिवली तर्फे गोवेले, पहेल, हरकोल, विहुले, कुमशेत, पळसप, शिरवली तर्फे, टोळ खुर्द, देगाव, वडवली, वणी मलईकोंड, गांगवली, नांदवी, गोवेले; तळा-रहाटड, चरई खुर्द, मांदाड, भानंग, निगुडशेत, तळेगावे तर्फे तळे; महाड-फाळकेवाडी, कुंबळे, रूपवली, कोळोसे, वाळण खुर्द, शिरसवणे, **(पान २ वर..)**

# पर्यावरण असंतुलनामुळे द्रोणागिरी डोंगराला धोका

### संरक्षणासाठी ठोस पावले उचला; आमदार महेश बालदी यांची 'लक्षवेधी'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरणमधील ऐतिहासिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या द्रोणागिरी डोंगराच्या संरक्षणाचा मुद्दा आता राज्य विधीमंडळाच्या व्यासपीठावर पोहचला आहे. स्थानिक आमदार महेश बालदी यांनी विधानसभेत या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडून डोंगराच्या जतनासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी सरकारकडे केली आहे.

विधानसभेत बोलताना आमदार महेश बालदी यांनी रामायणापासून उल्लेख असलेला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्याचा वारसा लाभलेला द्रोणागिरी डोंगर उरणकरांच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा भाग असल्याचे नमूद केले तसेच गेल्या काही वर्षांपासून या डोंगरावर मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड, धूप आणि अवैध उत्खनन यामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त केली. अरवली पर्वताच्या धर्तीवर १०० मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या डोंगराळ भागावर कोणत्याही प्रकारच्या डेव्हलपमेंटला परवानगी देऊ नये हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय द्रोणागिरीसाठीही लागू करावा. द्रोणागिरी डोंगराचा परिसर आयडेंटिफाय फॉरेस्ट म्हणून घोषित करून त्याचे संरक्षण करावे. डोंगरावरील अवैध उत्खनन आणि वृक्षतोड थांबवण्यासाठी शासनाने कठोर धोरण आखावे असे महत्त्वाचे मुद्दे त्यांनी लक्षवेधी सूचनेतून उपस्थित केले. **(पान २ वर..)**

## भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात कुणालाही सोडणार नाही -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात ज्या-ज्या व्यक्तीविरुद्ध पुरावा मिळेल, त्या प्रत्येकाची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २४) विधानसभेत दिली तसेच खरातच्या शिवनिका संस्थानच्या कार्यकारी संचालक मंडळाची सखोल चौकशी सुरू असून गैरकृत्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी विधानसभेत या प्रकरणाविषयी सविस्तर निवेदन करत तपासाची सद्यस्थिती मांडली. ते म्हणाले, आतापर्यंत पाच पीडित महिलांचे जबाब नोंदवण्यात आले असून एकूण आठ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी सात गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) करत आहे, तर एक गुन्हा नाशिक क्राईम युनिटकडे आहे. हा अंतरिम अहवाल असून दररोज नव्या बाबी समोर येत आहेत. आपण सगळे राजकारणात आहोत, त्यामुळे फोटो कुणासोबतही येऊ शकतो, मात्र सध्या डिलिटेड डेटा अवगत करण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार खरातचा कोणाशी संपर्क होता, कोणी मदत केली, त्या सर्वांवर कारवाई केली जाईल.

प्राथमिक तपासात खरातकडून सहा लाख रुपयांची रोकड, दोन लॅपटॉप, डीव्हीआर, रिव्हॉल्वर, जिवंत आणि वापरलेली काडतुसे जप्त करण्यात आली असून अधिक तपास सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. दरम्यान, खरातच्या पोलीस कोठडीत २९ मार्चपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

## प्रवाशांनी मारल्या लोकलमधून उड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांची लाईफलाइन असलेल्या लोकलमध्ये मंगळवारी (दि. २४) सायंकाळी थोडक्यात मोठी दुर्घटना टळली. बोरीवलीहून दादरला जाणारी लोकलला अचानक मोठा हादरा बसला अन् लोकल जागेवरच थांबली. या घटनेमुळे अनेकांचा जीव टांगणीला अडकला. काही जणांनी घाबरून धावत्या लोकलमधून उडी मारली.

यावेळी लोकलमध्ये भीती आणि प्रचंड गोंधळाची स्थिती तयार झाली होती. सुदैवाने यात कोणताही जीवितहानी झाली नाही, पण या थराराक प्रसंगामुळे लोकल सेवेवर परिणाम झाला.

## आमदार निरंजन डावखरे यांच्या विकास निधीतून १८ शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण पदवीधर मतदारसंघातील प्रत्येक शाळेची गरज ओळखून त्या ठिकाणी विकास निधीतून आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे काम आमदार निरंजन डावखरे सातत्याने करत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी येथे मंगळवारी (दि.२४) केले.

आमदार निरंजन डावखरे यांच्या स्थानिक विकास निधीतून पनवेल, उरण, कर्जत आणि खालापूर तालुक्यातील १८ शाळांना संगणक, प्रिंटर आणि प्रोजेक्टर यांसारख्या डिजिटल साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. भाजपच्या पनवेल येथील तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात हा डिजिटल शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम झाला.

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, आमदार निरंजन डावखरे यांच्या पत्नी नीलिमा डावखरे आणि पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांच्या हस्ते संबंधित शाळांच्या प्रतिनिधींना साहित्याचे हस्तांतरण करण्यात आले.

उपस्थित शिक्षकांना आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना नीलिमा डावखरे यांनी, परिसरातील शाळांनी शैक्षणिक साहित्याच्या मागण्या आमच्यापर्यंत पोहचवाव्यात, ते साहित्य उपलब्ध देऊ तसेच काही सूचना असल्यास त्याही जरूर कळवाव्यात, असे आवाहन केले. **(पान २ वर..)**



# ‘माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी अभिनव उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी’

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभे राहिले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री सत्य साई संजीवनी केंद्रामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांद्वारे विविध जिल्हा रुग्णालयांमध्ये हृदयरोग तज्ज्ञांकडून एकूण २,५०७ टू-डी-इको तपासण्या करण्यात आल्या. तसेच जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी राज्यभरातील आरबीएसके पथकांमार्फत ३२२६ बालकांवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र येथे उपचार करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार श्री सत्य साई संजीवनी केंद्राने पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि सातारा जिल्ह्यातील जावळी या आदिवासी बहुल तालुक्यांना दत्तक घेऊन तेथे विशेष आरोग्य उपक्रम राबविले. तसेच पुण्यातील शहरी झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या.



रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यात येत आहेत. विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये बालकांमधील जन्मजात हृदयरोग तपासणीसाठी मेगा शिबिरे सुरू असून, दुर्गम भागातील बालकांनाही अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत. नवी मुंबई येथे बांधकाम कामगार तसेच वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी विशेष आरोग्य प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांसाठी नॉन-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) आणि कर्करोग तपासणी प्रकल्पही सुरू करण्यात आला आहे.

याशिवाय, आजपर्यंत आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी अशा ३५०० हून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

# नेरळमध्ये विद्यार्थिनीवर अत्याचार

## लग्नाच्या भुलथापा देऊन लायब्रीयनचा कारनामा

**नेरळ : प्रतिनिधी**

शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे.नेरळ ममदापूर येथील दिलकप कॉलेजमध्ये इंजिनियरिंगचे शिक्षण घेणाऱ्या १९ वर्षीय विद्यार्थिनीला कॉलेजमधील असिस्टंट लायब्ररीयन असलेल्या शिक्षकाने प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी तौसिफ ठाणगे याला पोलिसांनी नेरळ-ममदापूर येथील राहत्या घरातून अटक केली आहे.आरोपी तौसिफ



ठाणगे हा कॉलेजमध्ये असिस्टंट लायब्ररीयन म्हणून कार्यरत होता. याच काळात त्याची ओळख १९ वर्षीय विद्यार्थिनीशी झाली. ओळखीचे रूपांतर हळूहळू जवळकीमध्ये झाले आणि त्याने विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. लग्नाचे खोटे आश्वासन देत हिंदू रिवाजांनुसार ‘सात फेरे’ घेतल्याचे सांगून तिची फसवणूक करण्यात आली.

यानंतर आरोपीने विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा आरोप आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपी आधीपासून विवाहित असून त्याला दोन मुले असल्याचे पुढे उघड झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विद्यार्थिनीने लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, आरोपीने यापूर्वीही काही मुलींना अशाच प्रकारे फसवल्याची चर्चा परिसरात असून, बदनामीच्या भीतीने अनेक पीडित मुली समोर न आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, शिक्षणसंस्थांमधील सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# रेवदंड्यात देव-देवस्कीला ऊत, अंधश्रद्धा निर्मुलन कागदावरच!

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडयात सध्या देव-देवस्कीला उत आला असून अनेक ठिकाणी गल्ली बोळात, अडगळीच्या ठिकाणी लिंबू, अंबीर,गुलाल, व हळदीचे पट्टे निदर्शनास येतात. एकदंरीत अंधश्रध्दा निर्मुलन कागदावरच राहिली असून रेवदंडयात अंधश्रध्दा भक्ताची संख्या दिवसेंदिवस वाढीस जात असल्याचे चित्र दिसते.

रेवदंडा प्राथमिक शाळेतील वर्गातच पाठीमागील दाराने प्रवेश करून कोणीतरी अज्ञाताने देव-देवस्कीचा प्रकार केल्याने खळबल उडाली. येथे लिंबू, हळद, आंबीर, गुलाल तसेच रक्ताचे दाग सुध्दा दिसत असल्याचे निदर्शनास आले. मात्र देव-देवस्कीसाठी शाळेचा वर्गच निवडल्याने ग्रामस्थ तसेच पालकवर्ग यामध्ये चिंता दिसून आली.



सध्या राजकीय तेढ, तसेच व्यावसायीक स्पर्धा यामधून देव-देवस्कीला भर मिळतोय, रेवदंडयात सध्या कंस्ट्रशन, व राजकीय व्यवसायात कमालीची तेढ वाढीस जात आहे, विरोधकांच्या उन्नतीला व गतीला ब्रेक देण्यासाठी असे देव-देवस्कीचे प्रकार सुरू आहेत. यामध्ये मध्यम वर्गिय व व्यावसायीक वर्ग जास्त आकर्षीत असल्याचे म्हटले जाते. अनेकदा ठिकठिकाणाहून मंत्रतंत्र करणारे महागुरूना सुध्दा पाचारण करण्यात येते, निवडणूक दरम्यान जिकडे तिकडे असे देवदेवस्कीचे प्रकार घडल्याची चर्चा जोरदार होती.

# कोळसाभट्टी मालकाच्या ताब्यातून दोन आदिवासी मुलींची सुटका

**अलिबाग , धाटाव : प्रतिनिधी**

कर्नाटकातील कोळसा भटटीवर काम करणारया रायगड जिल्हयातील दोन आदिवासी मुलींची सुटका करण्यात सर्वाहारा जनआंदोलनच्या कार्यकर्त्यांना यश आले. कोळसा भटटी मालकाने या मुलींना त्यांच्या आईवडीलांच्या ताब्यात दिले. सर्वाहाराच्या पाठपुराव्यामुळे तब्बल तीन वर्षांनी आई वडील आणि मुलींची भेट झाली.

रायगडच्या रोहा तालुक्यातील वरवटणे आदिवासी वाडीवरील संतोष जानू वाघमारे, त्यांची पत्नी सुनीता वाघमारे आणि दोन मुली अनिता व पूजा असे कुटुंब दहा वर्षांपूर्वी अहिल्यानगर येथील कोळसा भटटी मालक अनिल चव्हाण यांनी कोळसा भट्टी



कामासाठी, कर्नाटकातील रायपूर येथे नेले होते, दहा वर्ष सतत या कुटुंबाने, अनिल चव्हाण यांच्याकडे कोळसा पाडण्याचे काम केले, मात्र या कामाचा मोबदला म्हणून अनिल चव्हाण यांनी काहीही न दिल्याने व अनिल चव्हाण यांच्या सततच्या त्रासाला कंटाळून वाघमारे पतीपत्नी तीन वर्षांपूर्वी तेथून पळून गेले आणि दुसरीकडे काम करत राहिले. ऑक्टोबर २०२५ च्या दरम्यान कर्नाटक येथील काम सोडून वरवठणे येथे आपल्या गावी आले, परंतु दोन मुली अनीता आणि पूजा या दोघींना अनिल चव्हाण यांनी आपल्या ताब्यात घेऊन ठेवल्यामुळे या मुलींना न घेता या दोघांना तिथून निघावे लागले. अनिल चव्हाण यांनी या दोन मुलींना आपल्या ताब्यात ठेवले होते.

याबाबतची तक्रार सर्वहारा जन आंदोलन संघटनेकडे आल्यानंतर संघटनेच्या वतीने या प्रकरणी कार्यवाही सुरू केली मात्र हे प्रकरण कर्नाटक मध्ये घडले असल्याने आधी कोळसा भट्टी मालक अनिल चव्हाण यांच्याकडे फोन द्वारे विचारणा केली. सुरूवातीला त्याच्या ताब्यात मुली असल्याबाबत कबूल करण्यात टाळाटाळ केली मात्र सदर बाब ही गंभीर स्वरूपाची असल्याने आम्हाला नाईलाजास्तव आपल्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करून या मुलींना सोडवण्याचे प्रयत्न करावे लागतील असे सांगितल्यानंतर अनिल चव्हाण यांनी या मुली स्वतःकडे आहेत हे मान्य केले. त्याप्रमाणे या मुलींना आपण दोन दिवसात त्यांचे वडिलांच्या ताब्यात देण्यासाठी रोहा रायगड येथे घेऊन या व त्याच्या कामाचा हिशोब देखील आपल्याला करणे आवश्यक आहे. आपण न आल्यास निश्चितच आपल्या विरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सर्वाहारा जनआंदोलनाच्या वतीने सांगण्यात आले.

यानंतर मात्र अनिल चव्हाण यांनी या दोन्ही मुलींना रविवार २२ मार्च रोजी मंगळवेढा येथे संतोष वाघमारे आणि सुनीता वाघमारे यांच्या ताब्यात दिले.

# पनवेल आरटीओच्या ताफ्यात दोन रडार वाहने

**पनवेल: रामप्रहर वृत्त**

पनवेल आरटीओच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक रडार-आधारित इंटरसेप्टर वाहने दाखल झाली आहेत. वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनांवर हे वाहन ऑनलाईन स्वरूपात कारवाई करते.तासाभरात सुमारे २०० ते ३०० फोटो या वाहनावरील रडार यंत्रणा काढते.रस्ते वाहतुकीत होणारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर या रडार




वाहनाचे लक्ष असणार आहे. डिसेंबर २०२५ पासुन पनवेल आरटीओच्या ताफ्यात २ वाहने कार्यान्वित आहेत.स्कॉर्पिओ वाहनावर हि रडार यंत्रणा बसविण्यात आली आहे.हि यंत्रणा कार्यान्विय करण्यासाठी वाहन एक ठिकाणी थांबवून त्याठिकाणी लोकेशन सेट करावे लागते.यावेळी या वाहनाच्या जवळून जाणाऱ्या वाहनांचे छायाचित्र वाहन चालकासह हि यंत्रणा टिपते .यामध्ये विना हेल्मेट,ओव्हर स्पीड,ट्रिपल सीट,विना सीट बेल्ट आदी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास हि यंत्रणा सहजरित्या फोटो टिपते.या छायाचित्रांमध्ये घटनास्थळाचे लोकेशन,वाहन - वाहन चालकाचा फोटो चा समावेश असतो.

या रडारवर वाहनावरील उपस्थित अधिकारी पुढील कारवाई करिता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याकडे जाते.त्यानंतर पुढील प्रक्रियेत ई चलन थेट वाहन चालकाला मोबाईल अथवा मेलवर प्राप्त होते.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी निलेश धोटे,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रदीप नांदकर यांच्या माध्यमातून हे रडार वाहन पनवेल आरटीओ क्षेत्रात कार्यान्वित आहेत. १६ डिसेंबर २०२५ पासुन रडार वाहने कार्यान्वित झाली असुन तीन महिन्याच्या काळावधीत जवळपास ४५०० ते ५००० वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

**पनवेल आरटीओ कार्यालयात दोन रडार वाहने कार्यान्वित आहेत.हजारो वाहनांवर तीन महिन्यात कारवाई करण्यात आली आहे.वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर ऑनलाईन स्वरूपात कारवाई या रडार यंत्रणेद्वारे केली जाते.**
**- निलेश धोटे**
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,पनवेल आरटीओ

# वाशी रुग्णालयात रक्तदान तपासणी यंत्रणा बंद

## रुग्णांकडून नाराजी व्यक्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या वाशी येथील रुग्णालयात रक्तदाब तपासण्याची यंत्रणा बंद असल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागाच्या या दुर्लक्षपणामुळे रुग्णांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.दरम्यान,पर्याय म्हणून रक्तदाब डिजिटल यंत्रणा उपलब्ध केली गेली आहे.परंतु ही यंत्रणा अपेक्षित निकाल देत नसल्याने खुद्द वैद्यकीय तज्ञ समाधानी नसल्याचे सांगण्यात येते.



जीवनशैली बदलल्यामुळे रक्तदाब व मधुमेह या आजाराचा परिणाम राक्षसी रूप धारण करत आहे.१०० रुग्णाच्या मागे किमान तीस ते चाळीस रुग्ण हे या आजाराने त्रस्त असल्याचे देखील सांगण्यात येते. त्यामुळे कोणताही आजाराचा रुग्ण उपचारासाठी गेल्यावर प्रथम रक्तदाब व मधुमेह आहे का?अशा प्रकारची विचारणा वैद्यकीय तज्ञांकडून केली जाते. इतके गंभीर हे आजार असताना मनपाच्या रुग्णालयात अपेक्षित यंत्रणा नसल्याने रुग्णांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.वाशी येथील प्रथम संदर्भ रुग्णालयात दिवसाला किमान विविध आजाराचे १५०० ते २००० हजार रुग्णांची तपासणी केली जाते.

**नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील हॉस्पिटलमधील आरोग्य विभागाच्या संदर्भात रुग्णांच्या ज्या काही तक्रारी आहेत, त्यांची चौकशी करुन योग्य कार्यवाही केली जाईल.**
**-सुनील पवार,**
अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महापालिका

पान १ वरुन

## रायगडात ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक

कोंझर, वाळसुरे, मोहोत, चिंभावे मोहल्ला, बावले, चापगाव, चांढवे खुर्द, कोंडीवते, पडवी, राजेवाडी, तेलंगे, किंजळोली खुर्द, लोअर तुडील, चांभारखिंड, वराठी, पारमाची, दासगाव, रजिवली, किये, मोहोत्रे, वाघोली, नडगाव तर्फे बिरवाडी, बारसगाव, कावळे तर्फे विन्हेरे, ताम्हाणे; पोलदपूर-गोळेगणी, परसुले, उमरठ, पैठण, देवपूर, पांगळोली, महाळुंगे, दिवील, चांभारगणी बुद्रुक, तुर्भेखोंड, कुडपण बुद्रुक, काटेतळी, महालगूर, चरई, तुर्भे बुद्रुक, कोतवाल खुर्द, पार्ले; श्रीवर्धन-वाकळघर, बागमांडला, आदगाव, हरवित, दांडगुरी, सायगाव, भरडखोल, दिवेआगर; म्हसळा-खरसई, वरवटणे, आडी महाड खाडी, घोणसे, फळसप, रेवळी, कोळवट, जांभुळ, ठाकरोली, नेवरूळ, कुडगाव.

## पर्यावरण असंतुलनामुळे द्रोणागिरी डोंगराला धोका

राज्यातील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या पर्वत परिसरात होणाऱ्या विकासकामांबाबत शासन गंभीर आहे. अशा ठिकाणांच्या जतनासोबतच स्थानिक नागरिकांच्या भावनांचा आदर राखत शासनाच्या नियमांप्रमाणेच पुढील कार्यवाही केली जाईल, असे वनमंत्री गणेश नाईक यानी विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना स्पष्ट केले. मंत्री नाईक म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील उरण, मौजे चाणजे येथील द्रोणागिरी पर्वत भागाला ऐतिहासिक महत्व आहे. त्या ठिकाणाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. त्यामुळे अशा भागांमध्ये विकासकाम करताना नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. केंद्र सरकार तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार १०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या डोंगरांवर कोणतीही व्यावसायिक, निवासी किवा इतर विकासकामे करण्यापूर्वी सखोल तपासणी केली जाते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## आमदार निरंजन डावखरे यांच्या विकास निधीतून १८ शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, रमेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मोठी चालना मिळणार आहे.



# घणसोलीत निरंकारी रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रक्तदान शिबिरांची श्रृंखला कायम ठेवत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने मानवीयतेच्या भावनेतून घणसोली शाखेच्या वतीने घणसोली सेक्टर ९ येथील न्यू बॉम्बे सिटी स्कूल येथे भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी रक्तदात्यांकडून १५० रक्ताच्या बाटल्या जमा करण्यात आले.

मानवतेच्या भावनेतून आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये निरंकारी भक्तगणांसह स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. निश्चितच निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य शिकवणूकीमुळे निरंकारी भक्तगणांमध्ये मानव सेवेची भावना दृढमूल झालेली असून ते रक्तदानासह इतर अनेक सामाजिक सेवांमध्ये निरंतर आपले योगदान देत आहेत.

या शिबिराचा शुभारंभ निरंकार प्रभूच्या नामस्मरणाद्वारे मंडळाचे सेक्टर संयोजक मनोहर सावंत यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या प्रसंगी स्थानिक मुखी सदानंद हरिश्चंद्र पाटील (महाराज) व सेवादल क्षेत्रीय संचालक अशोक केरेकर यांच्यासह स्थानिक सेवादल अधिकारी उपस्थित होते.

# सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीची कर्जत आगाराला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने सकाळच्या सुमारास अचानक कर्जत एस टी आगाराला भेट दिली व सर्व परिसराची पाहणी केली तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगाराच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून अधिक चांगले आगार होण्यासाठी महत्वाच्या सूचना केल्या.

दुपारी सव्वा एकच्या सुमारास सुमारास पालघर जिल्ह्याचे विभाग नियंत्रक कैलास पाटील यांच्या अध्यक्षतेखालील सर्व्हेक्षण समिती कर्जत एस टी आगारामध्ये आली. विभागीय विजय पवार समिती सदस्य विजय मांडे, प्रवासी प्रतिनिधी पुंडलिक भोईर यांचा समितीमध्ये समावेश होता. सहाय्यक वाहतुक नियंत्रक महादेव पालवे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वाहतूक नियंत्रक दीपक देशमुख, वाहतूक नियंत्रक विलास बागुल, वसंत बागुल यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छता गृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय




दिला तसेच प्रवासी निवारा, सी एन जी पंपाची व्यवस्था, कार्यालयातील कामामध्ये वेगळ्या प्रकारच्या मांडणी बद्दल समाधान व्यक्त केले. काही आवश्यक सूचना दिल्या.

आगार व्यवस्थापकांचे निवास स्थान तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे. याबाबत समिती सदस्यांनी प्रशंसोदगार काढले. समिती अध्यक्ष कैलास पाटील यांनी ' प्रवासी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. अशी सूचना केली. पालवे यांनी, ' आगारासाठी नवीन एस टी गाड्या आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे.' असे सूचित केले. सदस्य मांडे यांनी, 'हे आगार १९८० च्या दरम्यान सुरु झाले. आगारासाठी भरपूर जागा आहे. मात्र बहुतांश इमारती नादुरुस्त आहेत. नूतनीकरणासाठी झाल्यास आगाराचे रूप बदलले जाईल.' असे सांगितले. पुंडलिक भोईर यांनी आरक्षण सुविधा सुरु करावी. अशी मागणी केली.

## निवडक

### आदई गावातून महिला बेपत्ता

**पनवेल :** आदई गाव परिसरातून २३ वर्षीय दिधीश्वरी सबुज मंडल ही महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. दिधीश्वरी मंडल या राहत्या घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडल्या असून त्या अद्याप परत आलेल्या नाहीत. बेपत्ता महिलेचे वर्णन असे की, रंग गोरा, उंची सुमारे ५ फूट २ इंच, मध्यम बांधा, काळे केस असून कानाजवळ जखमेचे निशाण आहे. घरातून बाहेर पडताना त्यांनी फिकट निळा चुडीदार ड्रेस व ओढणी परिधान केली होती तसेच पायात भुरकट रंगाच्या सॅन्डल होत्या. त्यांच्या जवळ मोबाईल फोनही होता. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया पवार करत असून संबंधित महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### महिलेसह चिमुकला बेपत्ता

**पनवेल :** परिसरातील सुकापुर येथून एक महिला व तिचा चार वर्षांचा मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पुष्पा मदन विश्वकर्मा (वय २८) या आपल्या राहत्या घरातून मुलगा प्रिन्स (वय ४) याला सोबत घेऊन निघून गेल्या. त्यानंतर त्या अद्याप घरी परतलेल्या नाहीत. घरगुती वादातून त्या निघून गेल्याची प्राथमिक माहिती असून, त्यांचा शोध सुरू आहे. संबंधित महिला हिंदी व नेपाळी भाषा बोलते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या संदर्भात कोणालाही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे येथे ८६५५३५४११३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मोहोपाडा येथे रामनवमी जन्मोत्सव

**मोहोपाडा :** येथील एचओसी कॉलनीतील श्री साईबाबा सत्संग केंद्राकडून गुरुवार, २६ मार्च रोजी श्री रामनवमी जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.पहाटे ५ वाजता भूपाली, काकड आरती, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक, मंगलस्नान, कलश पूजा, अर्चना आरती, सकाळी ८:३० वाजता श्री साई महीमा व श्री गुरुमहिमा कार्यक्रम, सकाळी १० ते १२ श्री रामजन्मोत्सवानिमित्त सुभाव्य किर्तन, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती, सायंकाळी सांजआरती, सायंकाळी ६:३० ते ८ वाजता संगीत भजन, रात्री ८:३० वाजता शेजआरती आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे श्री साईबाबा सत्संग केंद्राच्या आयोजकांनी बोलताना सांगितले.

### दुर्गामाता वर्धापनदिनी कार्यक्रम

**मोहोपाडा :** स्वर्गीय बहिणाबाई तुकडोजी दूधे यांच्या स्मरणार्थ दुधे परिवाराच्या वतीने नवीन वसाहत रिस येथे २६ वा वर्धापनदिन सोहळा, ३१ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याज आले आहे. सकाळी ८ वाजता अभिषेक, सकाळी १० ते ४ दुर्गा सप्तशृंगी ग्रंथाचे पारायण, दुपारी ४ ते ७ वाजता श्री स्वामी समर्थ महिला भजन, सायंकाळी ७ वाजता आरती, रात्री ८ ते १० वाजता माता की चौकी, दुपारी १ ते रात्री ९ महाप्रसाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती दुधे परिवाराच्या वतीने मातोश्री संकूल व्यवस्थापकांनी दिली.

# पनवेलमध्ये ऑल आऊट, कोम्बिंग ऑपरेशन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात परिमंडळ ०३ पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते व सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ऑल आऊट व कोम्बिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले. या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान डी बी मार्ग पोलीस स्टेशनमध्ये आरोपी नामे राकेश विश्वनाथ महामुनकर (वय ४४) या पाहिजे आरोपी यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.





यामध्ये एनडीपीएस भारतीय हत्यार कायदा, दारूबंदी अधिनियम, रहदारीस अडथळा निर्माण करणे, गुटका व तंबाखू जन्य पदार्थबंदीप्रमाणे एकूण १० गुन्हे नोंदवण्यात आले. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील हिस्ट्री सीटर एकूण ११ चेक केले त्यातील ६ मिळून आले तसेच गुंड ९ चेक केले असता ३ मिळून आले. तसेच एकूण ५ वॉरंट बजावणी, ९ समन्सची बजावणी, ७ पाहिजे व फरारी आरोपी, ४ लॉज चेकिंग करण्यात आले. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये २ ठिकाणी नाकाबंदी नेमण्यात आली होती.

यामध्ये नाकाबंदीदरम्यान ५७ वाहने पाहणी करून १० वाहनांवर कारवाई करण्यात आली. ऑल आऊट ऑपरेशन करिता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह आठ अधिकारी आणि ४२ पोलीस अंमलदार हजर होते.

## मंदिराची दानपेटी फोडणारा चोरटा पोलिसांच्या ताब्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कराडे खुर्द गावाजवळील बेलेंट्रा सोसायटीतील श्री गणेश मंदिराचा बंद दरवाजा उघडून मंदिरात ठेवलेले दानपेटीतील रक्कम चोरणाऱ्या चोरट्याच्या पोलिसांना मुसक्या आवळण्यात यश आले आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस सुधीर मोरे, पोलीस शरद फरांदे पोलीस रणजितसिंह खराडे यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासून आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपी एकनाथ उर्फ इक्या सिताराम कातकरी (वय २५) पेरुची वाडी, चावणे येथील असून त्याला मंदिरातील दानपेटीत



१० रु, २० रु, ५० रु, २०० रु. दराच्या भारतीय चलनातील नोटा व नाणी चोरल्याचे त्याने कबूल केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस पूनम शेळके अधिक तपास करीत आहेत.

## खारघर येथील गार्डनमध्ये सुधारणा आणि देखभाल कामे तातडीने करण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सेक्टर २०, शिल्प चौकजवळील पालिका गार्डनमध्ये विविध मूलभूत सुविधा व देखभालीसंदर्भात गंभीर समस्या निर्माण झाल्या असून, त्या तातडीने सोडविण्याची मागणी नगरसेविका परेशा पटेल यांनी आयुक्तांकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन भाजपचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी आयुक्तांना दिले.

हे उद्यान परिसरातील ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर वापरत असूनही खालील अडचणींमुळे नागरिकांना त्रास



सहन करावा लागत आहे. सकाळच्या वेळेत वॉचमन नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना स्वतः गेट उघडावे लागते, ज्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. उद्यानाभोवतीचे कुंपण अपुरे असल्याने लोक भिंतीवरून उड्या मारतात. यावर त्वरित उपाययोजना आवश्यक आहे.

उद्यानात बसवलेल्या ओपन जिमच्या साधनांची स्थिती तपासून ती कार्यान्वित करण्याची गरज आहे. बहुतेक गार्डन लाईट्स बंद असून संध्याकाळी नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो. त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. तुटलेल्या बाकड्या व सिमेंटचे अवशेष यामुळे अपघाताचा धोका असून सौंदर्यावर परिणाम होत आहे. मुख्य प्रवेशद्वाराजवळील फुटपाथ खराब अवस्थेत असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे.

नगरसेविका परेशा पटेल यांनी या सर्व समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती प्रशासनाला केली आहे.

## प्रभाग ८मध्ये अनधिकृत फेरीवाले, वाहन पार्किंगवर कारवाईची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मध्ये अनधिकृत टपऱ्या व फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात नगरसेविका बायजा बबन बारगजे यांनी महापौर नितीन पाटील यांना निवेदन देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, प्रभागातील आठवडे बाजारामुळे मुख्य रस्ते व फुटपाथवर अनधिकृतपणे फेरीवाले बसत असून त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. फुटपाथवर टपऱ्यांनी अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे.

तसेच बाजार संपल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात



कचरा साचत असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही ठिकाणी रस्त्यालगत पया अनधिकृत शेड्स उभारण्यात आल्याने समस्या अधिक गंभीर बनली आहे.

याशिवाय, सेंट जोसेफ शाळेजवळ काही चारचाकी टेम्पो चालकांनी अतिक्रमण करून गाड्या उभ्या करून व्यवसाय सुरु केल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. या टेम्पो धारकांवरही कारवाई करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ८ मधील अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या तसेच अतिक्रमण करणाऱ्या टेम्पो धारकांवर तातडीने निष्कासन कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

## रिटघर येथे आज शुभचिंतन समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ' आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ बुधवार, २५ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता रीटघर येथे होणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्या वर्षा केवारे, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगरे, सरपंच सुभाष भोपी, संस्थेचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही. यू. जगताप तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल कामोठे प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या समारंभात वारकरी संप्रदायातील ७५ जणांना भगवद्गीतेचे वाटप करण्यात येणार असून विद्यार्थ्यांकडून विविध कलागुणांचे सादरीकरणही केले जाणार आहे. या कार्यक्रमास पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, विलास भोपी, बळीराम भोपी, संजय पाटील, नवनाथ भोपी, वंदना भोपी, विष्णू भगत तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भारत भोपी, उपाध्यक्ष रमेश पाटील, पोलीस पाटील दीपक पाटील यांनी केले आहे.



**पनवेल : पंचायत समितीच्या सभापतीपदी प्रथमच भारतीय जनता पक्षाच्या रंजना वास्कर आणि उपसभापतीपदी भूपेंद्र पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते वामन शेळके यांनी सभापती आणि उपसभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी उपस्थित होते.**

## कळंबोलीत रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीत २३ मार्च रोजी रिक्षा चालक-मालक संघटनेची बैठक पार पडली. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले, खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर, प्रादेशिक परिवहन विभाग पनवेलचे मोटर वाहन निरीक्षक माळवे तसेच रिक्षा युनियन अध्यक्ष पनवेल, कळंबोली, खारघर उपस्थित होते.

पनवेल, कळंबोली, खारघर, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, तळोजा, कामोठे, परिसरात रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे रिक्षा चालकांच्या खूप तक्रारी वाहतूक पोलीस आणि आरटीओकडे येतात. अनेकदा रिक्षाचालक हे भाडे नाकारतात तसेच चालकाच्या बाजूला प्रवाशाला बसवतात. युनिफॉर्म घालत नाहीत तसेच प्रवाशांशी सौजन्याने वागत नाहीत त्यांच्याशी वाद घालतात.

या साऱ्या वाहतूक नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याने वाहतूक विभागाकडे तक्रारी येतात. त्यामुळे रिक्षा चालक आणि मालक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी रिक्षा चालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी सांगण्यात आले तसेच प्रवाशांशी सौजन्याने वागण्यासाठी सांगण्यात आले. यावेळी ४० ते ५० रिक्षाचालक उपस्थित होते.



## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाला आयएसओ नामांकन



**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाला आयएसओ मानांकन प्राप्त झाले असून सगळीकडे कौतुकाचा विषय ठरत आहे.

श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर या विद्यालयाने आयएसओ मानांकन प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण कार्यप्रणालीचा टप्पा गाठला आहे. ही प्राप्ती संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक प्रणाली, परिणामकारक व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सुधारणा या मूल्यांची अधिकृत पावती आहे.

आयएसओ हे प्रमाणपत्र शिक्षण संस्थेच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली व शाश्वत सुधारणा यांना आधारित करते अशा स्वरूपाचे मानांकन मिळवणे ही कोणत्याही संस्थेसाठी गौरवाची बाब मानली जाते. द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाने आयएसओ मानांकन प्राप्त करून या विद्यालयाने द्रोणागिरी विभागातच नव्हे तर उरण तालुक्यात नावलौकिक मिळवले. आयएसओ नामांकन प्राप्त करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

आयएसओ नामांकन विद्यालयाने प्राप्त केल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, वाय.टी.देशमुख, ॲड. राहुल घरत यांनीदेखील विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांचे अभिनंदन केले.

## अनधिकृत व्यवसायांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली प्रभाग समिती ब मधील सेंट जोसेफ शाळेजवळ सोमवार, २३ मार्च रोजी अनधिकृत पणे फूटपाथ वर आणि वाहनांमधून फळ व भाजी विकणाऱ्या वाहनांवर कारवाई करून दोन टेम्पो वाहने व दोन हातगाड्या जप्त करण्यात आल्या. प्रभाग समिती ब च्या अतिक्रमण विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे सेंट जोसेफ शाळेजवळ येथे होणारी ट्राफिकची समस्या कमी होण्यास मदत होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या वतीने पालिका हद्दीतील चारही प्रभागातील अनधिकृत झोपड्या, शेड, फळ-भाजी स्टॉल्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी तोडक कारवाई करण्यात येत आहेत.

कळंबोलीमधील फूटपाथवरील अनधिकृत फळे, भाजी विक्रेते तसेच इतर व्यवसाय स्टॉल्स वरही सातत्याने कारवाई करून फूटपाथ स्वच्छ करण्यात येत आहेत. याचप्रमाणे प्रभागातील अनधिकृत बॅनर्स वरतीही तोडकर कारवाई करण्यात येत आहे.

## राम नवमीनिमित्त योग फाउंडेशनतर्फे ऑनलाईन कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

राम नवमीच्या पावन मुहूर्तावर अंतर योग फाउंडेशनतर्फे जीवन आमूलाग्र बदलणारा प्रभू श्रीरामांचा अद्वितीय उपदेश श्री राम गीता शिबिर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी यांच्या दिव्य, रसाळ वाणीतून पुरुषोत्तम प्रभु श्रीरामांनी आपल्या लाडक्या बंधू लक्ष्मणाला दिलेल्या अमूल्य उपदेशातील गूढ रहस्य सांगणार आहेत.

यावेळी सुख-दुःख का येते?, मन शांत आणि स्थिर कसे ठेवावे?, कर्म आणि ज्ञान यात श्रेष्ठ काय?, अहंकार, मोह आणि भीतीवर विजय कसा मिळवावा? आदी सर्व प्रश्नांवर ब्रह्मर्षी आचार्य उपेंद्र जी आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक रामबाण उत्तरदेणार आहेत. २६ मार्च २०२६ पासून हा कार्यक्रम सुरू होणार असून वेळ सायं. ६ ते ८.३० पर्यंत ऑनलाईन (Zoom) होणार आहे.

कार्यक्रमासाठी आजच नोंदणीसाठी ७७१०९४८४६१ साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संपादकीय

# शांततेच्या दिशेने प्रयत्न

अमेरिका–इस्रायल आणि इराणदरम्यानच्या युद्धामुळे पश्चिम आशियातील परिस्थिती सर्वार्थाने गंभीर आहे. या संघर्षादरम्यान भारताचा राजनैतिक दृष्टिकोन संतुलित राहिला आहे. भारताचा या युद्धाशी काहीही संबंध नसला तरी त्याचे विपरित परिणाम भारतालाही भोगावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर युद्धादरम्यान पहिल्यांदाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी मंगळवारी फोनवरून संवाद साधला. सर्व संबंधित देशांनी शांततापूर्ण तोडगा काढावा यासाठी भारतही प्रयत्नशील आहे. ट्रम्प यांनी मोदींसोबत साधलेला संवाद हे शांततेच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे का हे लवकरच स्पष्ट होईल.

**अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त कारवाईतून सुरू झालेल्या युद्धाचा मंगळवारी २५वा दिवस होता. सोमवारी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील ऊर्जा प्रकल्पांवरील संभाव्य हल्ले पाच दिवस लांबणीवर टाकण्याची घोषणा केली. होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली नाही तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करण्याचा इशारा त्यांनी आधी दिला होता. परंतु ट्रम्प यांच्या नव्या घोषणेला इराणने अमेरिकेची माघार म्हणून संबोधले. ट्रम्प यांच्या युद्धविरामाच्या घोषणेवरील इराणची प्रतिक्रिया पाहता युद्ध थांबण्याची शक्यता कमी दिसते. परंतु या पाठोपाठच ट्रम्प यांनी मंगळवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संवाद साधला व मध्य पूर्वेतील परिस्थितीवर चर्चा केली. विशेषतः होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबाबत दोन्ही नेत्यांनी चर्चा केली असे समजते. भारताने या युद्धासंदर्भात सुरुवातीपासूनच शांतता आणि चर्चेची भूमिका घेतली आहे. जगभरातील लोक युद्ध थांबवण्याचा आग्रह संबंधित देशांकडे करत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी सोमवारी लोकसभेत युद्धसंकटाच्या परिणामांबाबत निवेदन केले. या संकटकाळात आखाती देशांतील एक कोटी भारतीयांची सुरक्षा हीच सरकारची सर्वात मोठी प्राथमिकता राहिली आहे हे मोदींनी स्पष्ट केले. केंद्र सरकार सुरुवातीपासून याबाबतीत संवेदनशील आणि तत्पर राहिले आहे. इराणने आखाती देशांवर हल्ले केल्याने त्यात काही भारतीयांचाही बळी गेला. जगभरातील व्यापारी जहाजांवर भारतीय मोठ्या संख्येने काम करतात. यापैकी काही भारतीयही युद्धाचे बळी ठरले आहेत. परंतु या संपूर्ण युद्धग्रस्त प्रदेशातून मोठ्या संख्येने भारतीयांना सुखरूप मायदेशी परत आणण्याचे काम सरकारने यशस्वीरित्या केले आहे. पश्चिम आशियाई राष्ट्रांमधील या सशस्त्र संघर्षामुळे जगभरातील इंधनपुरवठ्याची स्थिती चिंताजनक आहे. भारतातही घरगुती गॅसची टंचाई जाणवत असून विरोधी पक्षांनी त्याचा राजकीय लाभ उठवण्याचा प्रयत्न चालवला आहे. सोमवारी मोदींनी लोकसभेत विरोधकांच्या संबंधित टीकेला उत्तर दिले. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगभर होणाऱ्या इंधनाच्या वाहतुकीमध्ये युद्धामुळे गंभीर अडथळा निर्माण झाला आहे. कुठल्याही तऱ्हेने या अडथळ्याचे समर्थन होऊ शकत नाही. एकंदरच या युद्धामुळे जगभरात ऊर्जासंकट निर्माण झाले आहे. अलीकडच्या काळात होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेली अनेक जहाजे भारतात परतली आहेत. देशांतर्गत गॅस आणि इंधनांचा पुरवठा कमीत कमी बाधित होईल याची काळजी केंद्र सरकार घेते आहे. त्याचाच भाग म्हणून गॅस सिलिंडर आणि इतर इंधनांचा काळाबाजार वा साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही सरकारने दिला आहे व त्यादृष्टीने दक्षताही घेतली जाते आहे. या संकट काळात भारतीय संसदेने जगासमोर एकमताने आणि एकजुटीने आवाज उठवणे अत्यावश्यक असून विरोधक परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेतील अशी अपेक्षा आहे.**

# ‘पल्स’ वैद्यकीय परिषदेमुळे आरोग्यव्यवस्थेचा पाया अधिक बळकट

पल्स वैद्यकीय परिषदेच्या माध्यमातून आरोग्य व वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नवोन्मेष, संशोधन पुढे येईल. या क्षेत्रात नवनवीन संकल्पना, कार्य करणाऱ्या स्टार्टअप्सलाही परिषदेत व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. जगभरातून उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक परिषदेत येणार आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्यवस्थेचा पाया अधिक बळकट करणे शक्य होणार आहे.

भविष्यातील वैद्यकीय शिक्षण हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहणार नाही, तर तंत्रज्ञानाधारित, संशोधनकेंद्रित आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असणे अत्यावश्यक आहे. आज आरोग्य क्षेत्र झपाट्याने बदलत आहे, त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना केवळ पदवी नव्हे, तर जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता देणे ही काळाची गरज आहे. यासाठी काही महत्त्वाचे बदल आवश्यक आहेत. डिजिटल आणि सिम्युलेशन–आधारित शिक्षण, व्हर्चुअल लॅब्स, थ्री–डी ॲनाटॉमी, सर्जिकल सिम्युलेटर यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळेल. एआय आणि डेटा ॲनालिटिक्सचा समावेश, रोग निदान, रोग नियंत्रण आणि संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता समजणे अत्यंत गरजेचे ठरेल. संशोधन संस्कृतीला प्रोत्साहन, वैद्यकीय महाविद्यालयात रिसर्च लॅब्स, स्टार्टअप कक्ष आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी वाढवणे. ग्रामीण व समुदायाधारित प्रशिक्षण, विद्यार्थ्यांनी गावपातळीवर आरोग्यसेवा समजून घेतल्यास त्यांची सामाजिक जाणीव वाढेल. आंतरराष्ट्रीय सहकार्य व एक्सचेंज प्रोग्राम, परदेशी विद्यापीठांशी भागीदारी करून जागतिक दर्जाचे शिक्षण अनुभवण्याची संधी. मल्टिडिसिप्लिनरी दृष्टिकोन, वैद्यकीय शिक्षणासोबत व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि संवाद कौशल्यांचा समावेश. थोडक्यात, भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून तंत्रज्ञान जाणणारे, संशोधनप्रिय आणि समाजाभिमुख आरोग्यदूत असावेत, हा राज्य शासनाचा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्र याच दिशेने वैद्यकीय शिक्षणात बदल घडवून आणत आहे.

### डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय वैद्यकीय क्षेत्रात खऱ्या अर्थाने क्रांती घडवू शकते, कारण ती डॉक्टरांच्या कौशल्याला पूरक ठरते. एआयमुळे आजारांचे लवकर आणि अधिक अचूक निदान, एक्स–रे, एमआरआय, सीटी–स्कॅन यासारख्या तपासण्यांचे जलद विश्लेषण आणि उपचाराची योग्य दिशा ठरवणे शक्य होत आहे. त्यामुळे रुग्णाचा वेळ वाचतो, चुका कमी होतात आणि उपचार अधिक परिणामकारक होतात. भविष्यात एआय आधारित रोबोटिक सर्जरी, वैयक्तिकृत उपचार योजना आणि रोगाचा पूर्वानुमान हे मोठे बदल घडवतील. डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स यांचे महत्त्वही तितकेच मोठे आहे. डिजिटल नोंदी, ई–हॉस्पिटल प्रणाली, ऑनलाईन रिपोर्ट्स आणि मोबाईल हेल्थ ॲप्स यामुळे आरोग्यसेवा अधिक पारदर्शक आणि सुलभ होते. डेटा ॲनालिटिक्समुळे राज्य शासनाला रोगांचे ट्रेंड, लसीकरणाची गरज, संसर्गाचा प्रसार आणि आरोग्य धोरणांची दिशा अचूकपणे समजते. म्हणजेच, निर्णय हे अंदाजावर नव्हे तर अचूक माहितीवर आधारित घेतले जातात.

### आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्य

आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्याची शक्यता अत्यंत सकारात्मक आणि व्यापक आहे. एक्सचेंज प्रोग्राम, संयुक्त संशोधन प्रकल्प, ऑनलाईन अभ्यासक्रम आणि प्राध्यापक–विद्यार्थी देवाणघेवाण यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे ज्ञान आणि अनुभव मिळेल. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांना यामुळे आंतरराष्ट्रीय ओळख मिळेल आणि आपल्या डॉक्टरांना जगभरात स्पर्धा करण्याची ताकद प्राप्त होईल. थोडक्यात, एआय, डिजिटल हेल्थ आणि जागतिक सहकार्य यांची सांगड घातली तर महाराष्ट्राचे आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्र आधुनिक, अचूक आणि जागतिक दर्जाचे बनू शकते.

संशोधनाला चालना देणे ही राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण नवीन औषधे, आधुनिक उपचार पद्धती आणि तंत्रज्ञानाची प्रगती ही संशोधनातूनच घडते. यासाठी राज्य शासनाकडून वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधन प्रयोगशाळा बळकट करणे, विशेष संशोधन अनुदाने देणे, बायो–डेटा व क्लिनिकल स्टडीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्योग–संशोधन संस्था–शासकीय विभाग यांच्यात सहकार्य वाढवणे अशी ठोस पावले उचलली जात आहेत.तसेच पेटंट प्रक्रियेसाठी आर्थिक व तांत्रिक मदत, आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी आणि संयुक्त संशोधन प्रकल्प यांना प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून राज्यातील संशोधन जागतिक स्तरावर पोहचेल.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘पल्स’ परिषद ही एक मोठी संधी आणि प्रेरणादायी व्यासपीठ ठरेल. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना–देश–विदेशातील तज्ज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन ऐकण्याची संधी, नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल हेल्थ यांचा प्रत्यक्ष अनुभव, संशोधन पोस्टर सादरीकरण, पेपर प्रेझेंटेशन आणि स्पर्धांमध्ये सहभाग घेणे, इंटर्नशिप, फेलोशिप आणि करिअर नेटवर्किंगच्या संधी आणि स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रातील मार्गदर्शन म्हणजेच ही परिषद विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणार नाही, तर आत्मविश्वास, दृष्टी आणि जागतिक स्तरावर पुढे जाण्याची प्रेरणा देईल. भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून संशोधनप्रिय आणि तंत्रज्ञानसज्ज असावेत, यासाठी ही परिषद महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

थोडक्यात, ‘पल्स’ परिषद ही “चर्चेपासून कृतीकडे” नेणारी परिषद असेल जिथे निष्कर्ष थेट धोरणात आणि धोरण थेट जनतेच्या हिताच्या उपक्रमात रूपांतरित होईल. ‘पल्स’ परिषदेचा व्यापक दृष्टीकोन हा केवळ एका वर्षाचा किंवा एका प्रकल्पाचा नाही, तर पुढील काही वर्षांचा आरोग्य रोडमॅप ठरवण्याचा आहे. आम्ही महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्राला असे पाहतो की जिथे प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळेल मग तो शहरात राहो किंवा दुर्गम गावात.

### महाराष्ट्र : आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन

पुढील दशकात आमची स्पष्ट दिशा अशी आहे की, महाराष्ट्राला डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य व्यवस्थेत देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात राज्याला जागतिक दर्जाचे केंद्र बनवणे, ग्रामीण व आदिवासी भागात मजबूत प्राथमिक आरोग्य सुविधा उभ्या करून आरोग्यसेवेतील असमानता कमी करणे, मेडिकल आणि वेलनेस पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन म्हणून ओळख मिळवून देणे. स्टार्टअप्स, मेडटेक आणि बायोटेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती घडवून आणणे. या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक बनवणे. ‘पल्स’ परिषद म्हणजे या प्रवासाची सुरुवात आहे, जिथून पुढील दहा वर्षांसाठी ठोस दिशा आणि आत्मविश्वास मिळेल.

जागतिक आरोग्य संघटनांचा सहभाग हा महाराष्ट्रासाठी आणि आपल्या देशासाठी विश्वास, पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय मान्यता यांचा स्पष्ट संदेश देणारा आहे. जेव्हा अशा नामांकित संस्था आपल्या परिषदेचा भाग होतात, तेव्हा जगाला हे दिसून येते की महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात गंभीरपणे आणि दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून काम करत आहे. यामुळे दोन महत्त्वाचे संदेश जातात. पहिला म्हणजे आपली आरोग्य व्यवस्था जागतिक दर्जाची बनवण्याचा आपला निर्धार ठाम आहे. दुसरा म्हणजे– ज्ञान, संशोधन आणि सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्यासाठी आपण तयार आहोत.

### महाराष्ट्र : भारताचा हेल्थ गेटवे

भारताला आरोग्य क्षेत्रात “ग्लोबल हब” बनवण्याच्या प्रवासात महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि नेतृत्व करणारी असेल. आपल्या राज्यात आधीपासूनच जागतिक दर्जाची रुग्णालये, कुशल डॉक्टर, मजबूत वैद्यकीय शिक्षण व्यवस्था, औषधनिर्मिती उद्योग, प्रगत तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसारखी शहरे आधीच आरोग्यसेवा, संशोधन आणि मेडिकल टूरिझमची मोठी केंद्रे बनली आहेत. ‘पल्स’ परिषदेच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूक, संशोधन सहकार्य, स्टार्टअप इकोसिस्टीम आणि वेलनेस पर्यटन या सर्व घटकांना एकत्र आणत आहोत. यामुळे महाराष्ट्र केवळ राज्यापुरता मर्यादित न राहता भारताचा हेल्थ गेटवे म्हणून उभा राहू शकतो. जिथे जगभरातून रुग्ण उपचारासाठी, विद्यार्थी शिक्षणासाठी आणि उद्योग गुंतवणुकीसाठी येतील.

आज वैद्यकीय क्षेत्र अतिशय वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पना यांना स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आपल्या ज्ञानासोबत संवेदनशीलता, सामाजिक जाणीव आणि सतत शिकण्याची वृत्ती ठेवली तर आपण केवळ चांगले डॉक्टरच नव्हे, तर समाजाचे खरे आरोग्यदूत बनू शकता,

महाराष्ट्र शासन तुमच्या संशोधनाला, स्टार्टअप कल्पनांना आणि जागतिक संधींना नेहमी पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे, विभागीय संपर्क अधिकारी**



## बदलते तंत्रज्ञान

# वीज वाचवायची असेल तर एसी किती तापमानावर ठेवावा?

तुम्हाला माहितीये का तुमचा एसी कोणत्या तापमानावर ठेवला तर तुमचे वीज बिल कमी येईल? तुम्हाला माहितीये का तुमचा फ्रिज कोणत्या नंबरवर



ठेवला तर वीज कमी वापरेल? नाही ना... हे माहिती करून घेण्यासाठी आपल्याला थोड्याशा माहितीची गरज आहे. तुमच्या एसी, फ्रिजवर हे आकडे लिहिलेले असतात परंतू त्यांचा अर्थ आपल्याला कळत नाही.

प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरणावर ते किती वॅट वीज वापरते हे लिहिलेले असते. उदाहरण घेऊया... जर एखाद्या उपकरणावर २०० वॅट असे चिन्हांकित केले असेल, तर ते दर ५ तासांनी १ युनिट वीज वापरेल. त्याची गणना करण्यासाठी, तुम्ही हे सूत्र वापरू शकता: पॉवर (वॅट्स) ÷ वेळ (तास) × १००० = युनिट्स (ज्ञथह)

जर तुम्हाला तुमच्या एसी, फ्रिजच्या वीज वापराची माहिती जाणून घ्याची असेल तर एक काम करू शकता. तुम्ही ती उपकरणे बंद करावीत. नंतर वीज मीटरचे रिडिंग घ्यावे. आता तुम्हाला ज्याची माहिती हवी आहे ते उपकरण चालू करा आणि पुन्हा मीटर रिडिंग घ्या. यावरून ते उपकरण किती वीज वापरते याची माहिती मिळेल.


रेफ्रिजरेटर सहसा दररोज ०.५ ते १ युनिट वीज वापरतो. जर तुमचा रेफ्रिजरेटर खूप मोठा असेल किंवा त्याची कूलिंग क्षमता जास्त असेल तर विजेचा वापर देखील वाढणार हे लक्षात ठेवावे. फ्रिजमध्ये आत नॉब दिलेला असतो व चार्टही असतो. त्यानुसार खटका फिरवावा. एलईडी टीव्ही प्रति तास सुमारे ५० ते १५० वॅट वीज वापरू शकतात आणि जुने सीआरटी टीव्ही २०० वॅटपर्यंत वीज वापरू शकतात. वॉशिंग मशीनचा वीज वापर त्याच्या मॉडेल आणि मोडवर अवलंबून असतो, परंतु सरासरी ते प्रति तास ४०० ते १५०० वॅट्स घेऊ शकते.

**एसी कोणत्या टेम्परेचरवर ठेवावा...**

तुमचा एसी जर तुम्हाला जास्त वीज वापरू नये असे वाटत असेल तर तुम्ही तो २४ ते २६ टेम्परेचरवर ठेवावा. सेट करावा. थंड हवे असेल तर २४, साधारण थंड हवे असेल तर २६. टेम्परेचरवर ठेवावा

# भारतीय हवामान शास्त्रज्ञ वसंत गोवारीकर

वसंत रणछोड गोवारीकर हे भारतीय शास्त्रज्ञ होते. ते भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे संचालक होते आणि १९९१ ते १९९३ पर्यंत भारताच्या पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागारदेखील होते. गोवारीकर यांनी अंतराळ संशोधन, हवामान आणि लोकसंख्या या क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. मान्सूनचा अचूक अंदाज वर्तवणारे स्वदेशी हवामान अंदाज मॉडेल विकसित करणारे ते पहिले शास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुणे येथे झाला. पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी कोल्हापूरमध्ये घेतले आणि इंग्लंडच्या बर्मिंगहॅम विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. आणि पीएच.डी. ह्या पदव्या मिळवल्या. त्यानंतर ते हार्वेल येथील इंग्लंडच्या अणूऊर्जा संशोधन विभागात काम करू लागले.



## निमित्त

‘कीटकनाशकांचा विश्वकोश’ तयार केला. अग्निबाणांसाठी लागणारे घनइंधन बनवण्याची जबाबदारी गोवारीकर यांच्यावर सोपवण्यात आली. त्यासाठी त्यांनी प्रॉपेलंट इंधन कॉम्प्लेक्स, आयोनियम परक्लोरेट प्लांट अशा पूरक यूनिट्सची स्थापना केली. ‘सॉलिड प्रॉपेलंट स्पेस बूस्टर प्लांट’ हे जगातले सर्वात मोठे यूनिट त्यांनीच स्थापन केले. त्यांनी ‘एचटीपीबी’ हे घन इंधन विकसित करून तीस वर्षे उलटली. परंतु आजही ते जगातले सर्वाधिक अद्ययावत इंधन मानले जाते. १९७३ ते १९७९ या कालावधीत ते विक्रम साराभाई अंतराळ केंद्रात कार्यरत होते. १९७९ ते १९८५ मध्ये ते या केंद्राचे प्रमुख होते.पॉलिमर केमिस्ट्रीमधील त्यांचे संशोधन जगभर गाजले. भारतीय अवकाश संशोधन क्षेत्रात त्यांनी डॉ. साराभाईंप्रमाणेच मोलाचे योगदान दिले. त्यानंतर पाच वर्षे त्यांनी भारत सरकारच्या विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे सचिव म्हणून काम केले. १९९१ ते १९९३ या कालावधीत त्यांनी पंतप्रधानांच्या सल्लागाराची भूमिका बजावली.चार पंतप्रधानांसोबत त्यांनी वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम केले. राजीव गांधी, व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर आणि पी. व्ही. नरसिंहराव यांनी डॉ. गोवारीकरांचे शास्त्रज्ञ म्हणून महत्त्व जाणले.

डॉ.गोवारीकरांच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये ‘एसएलव्ही ३’ ही यान मोहीम यशस्वी झाली. १९९४ ते २००० दरम्यान त्यांनी मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्षपद भूषवले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ते माजी कुलगुरू होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. भारतीय लोकसंख्येवर भाष्य करणारे ‘आय प्रेडिक्ट’ हे पुस्तक गाजले. पद्मश्री, फाय फाऊंडेशन, विविध विद्यापीठांनी त्यांना मानद डॉक्टरेट दिली होती. त्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारले.

मोसमी वाऱ्यांचा पावसावर प्रभाव टाकणाऱ्या १६ घटकांचा सखोल अभ्यास करून त्यांनी हवामानाचा अंदाज लावण्यासाठी एक आराखडा तयार केला.हा आराखडा खूपच यशस्वी ठरला आहे. त्यांनी बनवलेला खतांचा कोश संपूर्ण जगातला तसा पहिला कोश ठरला आणि त्याला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली. त्यांना भारतीय खगोल मंडळाच्या वतीने आर्यभट्ट पुरस्कार देण्यात आला होता. भारत सरकारच्या वतीने त्यांना पद्मश्री आणि पद्मभूषण हे सन्मान देऊन गौरविण्यात आले होते. अशा या भारतीय संशोधकाचे २ जानेवारी २०१५ रोजी निधन झाले. साभार : इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# आंबा पाण्यात भिजवून खाणे ठरेल फायदेशीर

उन्हाळ्यासोबत आता आंब्याचा सीझन सुरू झाला आहे. उन्हाळ्यात चवदार, स्वादिष्ट आंबा खाण्याची एक वेगळीच मजा असते. आंबा हे असे फळ आवडत नाही असे फार कमी जण असतील. आंब्याच्या चवीमुळे खाताना एक मनशांती मिळते. लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना आंबा खायला आवडतो, पण घरातील वृद्ध आजी, आई अनेकदा आंबा पिण्यात भिजवून मग खा असे सांगताना दिसतात, पण आंबा पाण्यात भिजवूनचं का खाल्याला जातो? यामागचे कारण जाणून घेणे महत्त्वाचे आहे.



लहानपणापासून आंबा खाण्यापूर्वी आई, वडील पाण्यात काहीवेळ भिजवत ठेवून मग आपल्याला खायला देताना पाहिल असेल, पण आंबा खाण्यापूर्वी भिजवण्यामागे केवळ रसायने, घाण आणि धूळ काढणे एवढाच उद्देश नसतो. तो धुवून न घेतल्यास त्याची गुणवत्ता आणि चवही खराब लागते.

उष्णता कमी करण्यास मदत : आंब्यामध्ये थर्मोजेनिक गुणधर्म असतात जे शरीराच्या कार्यावर परिणाम करतात. यात आंब्यात फार उष्णता असते आणि उन्हाळ्यातील उष्णतेत तुम्ही आंबे खाता तेव्हा तुमच्या शरीरातही उष्णता वाढते. ज्यामुळे पचनसंस्था आणि आतड्यांवर परिणाम होऊ शकतो, पण आंबे भिजवल्याने त्यातील उष्णता कमी होण्यास मदत होते, तसेच बद्धकोष्ठता, त्वचेच्या समस्या, डोकेदुखी आणि जुलाब यांसारख्या समस्याही बऱ्याच प्रमाणात कमी होतात. त्यामुळे आंबा अर्धा तास पाण्यात भिजवल्यास थर्मोजेनिक गुणधर्मही कमी होतात.

विविध आजारांपासून संरक्षण : कीटक, तण आणि विविध जंतूंपासून आंब्याच्या झाडाचे संरक्षण करण्यासाठी कीटकनाशके आणि रसायनांची फवारणी केली जाते, या रसायनांचा आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. कारण कीटकनाशकांमुळे त्वचेची जळजळ, मळमळ, श्वसनमार्गात जळजळ, ॲलर्जी, कर्करोग आणि डोकेदुखी इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

आंबा भिजवून ठेवल्याने त्याच्या देटावरील चिटकपणा निघून जातो. आंब्याच्या देठावर पांढऱ्या रंगाचा एक चिकट पदार्थ बाहेर येतो ज्यामध्ये फायटिक ॲसिड असते. यामुळे आंब्याची चव वेगळी लागते आंबे पाण्यात साधारण 15 ते 20 मिनिटे भिजवून खावे.

# कर्जत तालुक्यात ग्रामपंचायतींचे लाईट बिल थकल्याने पाणीपुरवठा ठप्प; ग्रामस्थ हैराण

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ग्रामपंचायतींकडून पाणीपुरवठ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वीज बिलांची थकबाकी वाढल्याने महावितरणने विद्युत पुरवठा खंडित केला असून, ऐन उन्हाळ्यात गावागावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. खांडस आणि कोल्ह्यारे ग्रामपंचायत परिसरात परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.



खांडस ग्रामपंचायत हद्दीत गेल्या दहा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प असून ग्रामस्थांना खाजगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी २०० लिटरच्या पिंपामागे १०० रुपये, तर इतर वापरासाठी ५० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे. विशेष म्हणजे येथील ग्रामीण रुग्णालयात तब्बल सहा महिने पाणी नव्हते, ही बाब अधिक धक्कादायक ठरली आहे.

ग्रामपंचायतीने सुमारे दोन लाख रुपयांचे वीज बिल न भरल्याने महावितरणने वीजपुरवठा खंडित केला होता. नोटीस देऊनही बिल न भरल्याने अखेर ही कारवाई करण्यात आली. यामुळे गावात पाणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर काही दिवसांपूर्वी टँकरद्वारे रुग्णालयात पाणी पोहोचवण्यात आले.

दरम्यान, ग्रामसेवक मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गावातील पाणीपट्टी वसूल न झाल्याने वीज बिल भरणे शक्य झाले नव्हते. मात्र दोन दिवसांपूर्वी थकबाकी भरून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.दुसरीकडे, कोल्ह्यारे ग्रामपंचायतीतही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. सुमारे ३ लाख ४५ हजार ४५० रुपयांचे वीज बिल थकल्याने महावितरणने येथील वीजपुरवठा खंडित केला. परिणामी कोल्ह्यारे, धामोते व हजारेनगर परिसरात पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. उल्हास नदी जवळ असतानाही "उल्हास नदी उशाला, पण कोरड घशाला" अशी अवस्था ग्रामस्थांची झाली आहे.

या भागात मोठ्या प्रमाणात गृहसंकुले उभी राहिली असून लोकसंख्या वाढली आहे. मात्र पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना टँकरद्वारे महागडे पाणी विकत घ्यावे लागत आहे. सोशल मीडियावरही कोल्ह्यारे ग्रामपंचायतीच्या कारभाराची खिल्ली उडवली जात आहे.

एकीकडे प्रचंड उन्हाचा तडाखा आणि दुसरीकडे पाण्यासाठी वणवण, अशा दुहेरी संकटात कर्जत तालुक्यातील नागरिक सापडले आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत असून, तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## वाहतूक शाखेने दोन लाख रुपये दंड केला वसूल

**आलिबाग :-** दिनांक २३.०३.२०२६ रोजी जिल्ह्यात २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी वकर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम  भंग करणा-या एकूण १९९ इसमावर कायदेशीर कारवाई करण्यातआली असून त्यांच्याकडून २,०४,९००/-रुपये इतका दंड आकारला आहे.

---

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

ई-निविदा सूचना क्र : पमपा/ उद्यान/६६२५/प्र.क्र.०४/७५/२०२५ दिनांक : २४/०३/२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील उत्सव चौकात वॉटर प्रुफिंग करणे. | PMC/Garden/ 10/2025 -26 | रु.१८,५६,४७७/- (GST वगळून) | १८५६५/- | ३ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.८३/९३/२०२६
दिनांक : २४/०३/२०२६

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका, पनवेल

---

**स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव**

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्यांचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण रा. एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं. ३. रूम नं. १/२. खोपोली, पो-शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३ | मौजे शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड येथील फ्लॅट नं. १ आणि २, तळमजला, एचएमएस कॉम्लेक्स, बिल्डींग नं. ३, सर्वे नं. २६ अे, हिस्सा नं. २, सिटीएस नं. २१४८, | ८०.९९ चौ. मि | ८०.९९ चौ. मि | | शुक्रवार दिः १०/०४/२०२६ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट नं-१, ६२६, मारुती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६ |

टिप-

१) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाच्या वेळी करण्यात येईल
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केल्या जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमतेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) अपसेट व्हॅल्यू रु. ४०,८२,४८१/- (अक्षरी रुपये चाळीस लाख ब्याऐंशी हजार चारशे एक्याऐंशी मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- २४/०३/२०२६

सही/-
(सुनिल सदानंद गद्रे)
विषेश वसुली व विक्री अधिकारी,
वसुली अधिकारी
महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे
कलम १५६ चे नियम १९६१ चे
नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त

---

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल.**
नोंदणी क्र. : आर.जी.डी. (पी.डब्ल्यू.एल.) आर.एस.आर. (सी.आर) ५१८/३१-८-१९९५.
६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल - जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८०८२५५५४०८, ८१०८२९४९९१. Email - kamalmahila@yahoo.in

**जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस**

जा.क्र. ३१/८४१/२०२५-२०२६, वसुली-स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : २४/०३/२०२६

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रू. २६,५४,१८१/- (अक्षरी रूपये सव्वीस लाख चोपन्न हजार एकशे एक्याऐंशी मात्र) अधिक दि. २५/०३/२०२६ पासूनचे पुढे होणारे व्याज येणेपोटी श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण रा. एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं. ३. रूम नं. १/२. खोपोली, पो-शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३ यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विकीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण रा. एच.एम.एस. कॉम्प्लेक्स, बिल्डिग नं. ३. रूम नं. १/२, खोपोली, पो- शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. १०/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० ते दु. १.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी **हे मौजे शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड येथील फ्लॅट नं. १ आणि २, तळमजला, एचएमएस कॉम्लेक्स, बिल्डींग नं. ३, सर्वे नं. २६ अे, हिस्सा नं. २, सिटीएस नं. २१४८, क्षेत्र ८०.९९ चौ. मि.** या मिळकतीचे जाहीर लिलावाने विकी करतील.

**स्थावर मिळकतीचा तपशिल**

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क्र. सी. सी./आर.जी. डी/१३५/ २०२३-२४ दि. २७/०६/२०२४ | श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण<br>श्री. विशाल श्रीपती जाधव<br>श्री. निलोफर रियाज पठाण | शिळफाटा ता. खालापूर, जि. रायगड. | मौजे शिळफाटा, ता. खालापूर, जि. रायगड येथील फ्लॅट नं. १ आणि २, तळमजला, एचएमएस कॉम्लेक्स, बिल्डींग नं. ३, सर्वे नं. २६ अे, हिस्सा नं. २, सिटीएस नं. २१४८ | ८०.९९ चौ. मि | | श्री. शफी मोहम्मद युसुफ पठाण | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रु. ४०,८२,४८१/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क्र. वसुली स्थावर जप्ती दिनांक १८/०३/२०२६ अन्वये जप्ती ताबा घेतला आहे.

ठिकाण : पनवेल

सही/-
(सुनिल सदानंद गद्रे)
विषेश वसुली व विक्री अधिकारी,
वसुली अधिकारी
महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे
कलम १५६ चे नियम १९६१ चे
नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त

---

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांजकडून

**शुद्धीपत्रक**

क्रमांक/उविअमा/भूसं/कात-२/पाणसई/एसआर-९७/२०१२ दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/ कात-2/एसआर - ९७/२०१२ दिनांक ०७/०७/२०१५ अन्वये मौजे पाणसई, ता. माणगांव, जिल्हा -रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२) ची अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रात सन २०१५ रोजी प्रसिध्द झाली आहे; -

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ०९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/ उद्योग-१४ दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ अन्वये मौजे - पाणसई, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहिर केले आहे;

त्याअर्थी, स्थानिक वर्तमान पत्रात सन २०१५ मध्ये प्रसिध्द झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२ (२) च्या अधिसूचनेत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा - रायगड, ता. माणगांव, गांव पाणसई**

| यापूर्वीचा तपशिल | | |
|---|---|---|
| सर्व्हे नंबर / गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
| (१) | (२) | (३) |
| १७१ | १५ | ०.०७० |

| वाचण्याचा तपशिल (दुरुस्ती प्रमाणे) | | |
|---|---|---|
| सर्व्हे नंबर / गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
| (१) | (२) | (३) |
| प्रस्तूत स. नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे. | | |

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव

ठिकाण -माणगांव,
दिनांक - १८/०३/२०२६.

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४३३/४०८/२०२६

---

## उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव जि. रायगड यांज कडून

क्रमांक - उविअमा -भूसं/ कात-२/ एस.आर. १७८ / २०२६, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-तीन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. ०७ वर प्रसिध्द करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६ / (प्र.क्र.३५) / उ-१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी हया उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा ''उक्त महामंडळ'' असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम 32 अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२ (१७४४१), उद्योग १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये ? या संबंधी ही **नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून 30 दिवसाच्या आत** खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सहीं करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कयदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव

ठिकाण -माणगांव,
दिनांक - १८/०३/२०२६.

**अनुसूची**
**जिल्हा - रायगड, तालुका - रोहा, गांव -दुरटोली**

| अ.क्र. | सव्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | 71 | पैकी | 0.0205 |
| 2. | 72 | पैकी | 0.0932 |
| 3. | 73 | पैकी | 0.3341 |
| 4. | 74 | पैकी | 0.0194 |
| 5. | 613 | पैकी | 0.1402 |
| 6. | 615 | पैकी | 0.4945 |
| | | एकुण | 1.1019 |

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव

ठिकाण -माणगांव,
दिनांक - १८/०३/२०२६.

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४३३/४१८/२०२६

# ज्येष्ठ नागरिकांना लुटणारे त्रिकुट जेरबंद

## रबाळे पोलिसांची कामगिरी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत विविध ठिकाणी बोलण्यात गुंगवून, थापा मारून त्यांच्याकडील किमती चीज वस्तू हातचलाखीने काढून घेण्याचे अनेक प्रकार घडत आहेत. अशाच पद्धतीने एका ज्येष्ठ नागरिक महिलेस बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडील एक लाख ५४ हजार रुपयांची ११ टोळ्यांची सोनसाखळी चोरी झाली होती, मात्र पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावत या प्रकरण तिघांना जेरबंद केले आहे.

त्यांच्याकडून अशाच पद्धतीने केलेले अनेक गुन्हे उकल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशोक विठ्ठल काळे (वय २२) विष्णू शिवाजी पवार (वय २७) वर्षे, लखन उर्फ कार्तिक दारासिंग काळे (वय १९) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. २४ डिसेंबरला दुपारी बाराच्या सुमारास ५९ वर्षीय अनुसया शिंदे या आपले काम करून ऐरोली परिसरातून घरी पायी जात असताना संशयित आरोपींनी त्यांना गाठले.

आमच्या सेठला मुलगा झाला आहे. या आनंदात ते महिलांना साडी वापर करीत आहे. तुम्हाला साडी हवी असेल तर तुम्हीही जा असे आमिष दाखवले. दुर्दैवाने या आमिषाला बळी पडून अनुसया या साडी घेण्यासाठी जात असताना संशयित आरोपींनी त्यांना पुन्हा अडवत सेठ केवळ गरिबांना साड्या देत असून तुमच्या गळ्यात तर सोनसाखळी आहे. तुम्ही सोनसाखळी काढून पर्समध्ये ठेवा असा सल्ला संशयित आरोपींनी दिला.

अनुसया यांना ही गोष्ट पटल्याने त्यांनी सोनसाखळी काढून पर्स मध्ये ठेवत असताना त्यांना मदत करण्याच्या बहाण्याने आरोपींनी हातचलाखी करून हि सोनसाखळी स्वतःकडे ठेवली. अनुसया यांच्या लक्षात हि बाब न आल्याने त्या संशयित आरोपींनी दाखवलेल्या ठिकाणी निघून गेल्या. पुढे गेल्यावर कुठलाही सेठ साडी वाटत नाही. हे लक्षात आल्यावर त्यांनी सोनसाखळी पाहणी केली तेव्हा सोनसाखळी चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

या प्रकरणी त्याच दिवशी त्यांनी रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक खरात, पोलीस हवालदार दर्शन कटके, मयूर सोनवणे, पोलीस नाईक, गणेश वीर, धनाजी भांगरे पोलीस शिपाई यादवराव घुले आणि मनोज देडे यांचे पथक स्थापन करीत तपास सुरू केला.

या पथकाने गुन्हयाच्या अनुशंगाने घटनास्थळाचे निरीक्षण करून घटनास्थळी असणारे सीसीटीव्ही कॅमेरे पाहून तसेच तांत्रिक विश्लेषणवरून आरोपींची माहिती मिळवली, मात्र आरोपी पोलिसांच्या हाती लागले नव्हते. दरम्यान, आरोपी हे कोपरखैरणे भागात असल्याची माहिती मिळताच तपास पथकाने शोध मोहीम घेत सर्वांना ताब्यात घेत अटक केली. तीन गुन्ह्यांची उकल झाली असून अशाच गुन्हे पद्धतीने त्यांनी यापूर्वी गुजरात, मुंबई आणि ठाण्यात गुन्हा केला आहे.

# नवी मुंबईत सिग्नलमुक्त प्रवास

## तीन उड्डाणपूल, दुहेरी भुयारी मार्ग उभारण्याचा प्रस्ताव मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ठाणे ते बेलापूर मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा आता सिग्नल मुक्त सुसाट प्रवास करता येणार आहे. या मार्गावर सहा ठिकाणी उड्डाणपूल असताना ठाणे ते बेलापूर मार्गावर रबाळे, पावणे, तुर्भे येथे उड्डाणपूल तसेच पामबीच मार्गाच्या एंड ऑफ जंक्शन अर्थात महापालिका मुख्यालयाजवळ दुहेरी भुयारी मार्ग उभारला जाणार आहे. सोमवार, २३ मार्च रोजी झालेल्या महासभेत या प्रस्तावाला हिरवा कंदील देण्यात आला आहे.

पालिकेचे सभागृह नेते सागर नाईक यांनी महासभेत सदर प्रकल्पाच्या ३०/७० टक्के खर्चाच्या टप्प्यातील प्रस्ताव तसेच पुलाच्या कामासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचा प्रस्ताव महासभेत मांडला होता.

### असे आहे खर्चाचे नियोजन

'हायब्रिड अॅन्युइटी मॉडेल' (HAM – ३०:७०) या आर्थिक पद्धतीने केली जाणार आहे. या प्रणालीत प्रकल्पाच्या एकूण खर्चातील ३० टक्के रक्कम सुरुवातीला ठेकेदाराला देण्यात येणार असून उर्वरित ७० टक्के रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर पुढील दहा वर्षांत टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या अर्थसंकल्पावर तातडीचा आर्थिक ताण पडणार नाही

शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे त्याचप्रमाणे अटल सेतूमुळे तसेच वाशी आणि ऐरोली खाडी जोड पुलामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्याचाच शहरात रीडेव्हलपमेंट सुरू असल्याने वाढता ताण लक्षात घेता भविष्यातील वाहतूक नियोजन करण्याच्या अनुषंगाने ठाणे ते बेलापूर मार्गावर उड्डाणपूल आणि दुहेरी भुयारी मार्ग उभारणे आवश्यक असल्याने हा प्रस्ताव मांडल्याचे सागर नाईक म्हणाले.

या प्रस्तावावर बोलताना नगरसेवक सुधाकर सोनावणे यांनी शहरातील या उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाबरोबरच आवश्यक ठिकाणी उड्डाणपूलांची उभारणी करण्याकरिता सर्व्हे करावा, अशी मागणी केली. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करण्यास आणि संबंधित अधिकार आयुक्तांना देण्यासही महासभेने मान्यता दिली आहे.

# मच्छी विक्रेत्या महिलांना मासळी मार्केटमधील १७ गाळ्यांचे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

दिवाळे गाव हे नवी मुंबईतील नव्हे तर महाराष्ट्रातील पहिले स्मार्ट व्हिलेज असून याची नोंद देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही घेतली आहे. त्या अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांच्या पुढाकारातून दिवाळे गाव येथे आधुनिक सुसज्ज असे मासळी मार्केट उभारण्यात आले होते त्यानुसार मासळी मार्केटमधील उर्वरित १७ गाळ्यांचे अधिकृत वाटप भाजप नवी मुंबई जिल्ह्याचे महामंत्री निलेश म्हात्रे तसेच नवी मुंबई महापालिकेचे उपायुक्त सोमनाथ पोटरे व सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर यांच्या हस्ते दिवाळे गावातील मच्छी विक्रेत्या महिला यांना वाटप करण्यात होते.

त्याअनुषंगाने २३ मार्च २०२६ रोजी बेलापूर येथील अे विभागाचे सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर यांच्या उपस्थितीत १७ गाळ्यांचे ताबा पावती मच्छी विक्रेत्या महिलांना सुपूर्द करण्यात आले. तसेच बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने 'दिवाळे गाव – स्मार्ट व्हिलेज' अंतर्गत संपूर्ण दिवाळे गाव हा स्मार्ट व्हिलेजच्या पूर्णत्वास जात आहे. तसेच समाजपयोगी बहुउद्देशीय इमारत, तरुणांसाठी व्यायाम शाळा, विद्यार्थी–वाचकांसाठी सुसज्ज ग्रंथालय व कंप्युटर प्रशिक्षण केंद्र, विविध कार्यक्रमासाठी बहुद्देशीय इमारत अशी अनेक कामे प्रगतीपथावर सुरू असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

### आमदार मंदा म्हात्रे यांचा पुढाकार

या मासळी मार्केटमुळे स्वच्छता, पाणी, वीज व संरक्षित विक्री व्यवस्था यांचा लाभ झाला आहे. तसेच नर्मदा मारुती कोळी, हेमा संतोष कोळी, कल्पना चंद्रकांत कोळी, आरती आशिष कोळी, पौणिमा सचिन कोळी, शकुंतला नारायण कोळी, भारती गणेश कोळी, विनंती मंगेश कोळी, कल्पना नामदेव कोळी, रेश्मा संतोष कोळी, मेघा अनंत कोळी, शारदा वसंत टिपू, वैशाली विश्वनाथ कोळी, सीताबाई भालचंद्र कोळी, नीलिमा विजय कोळी, प्रमिला मिलिंद कोळी, करिष्मा रमेश कोळी या महिलांना ताबा पावती सुपूर्द करण्यात आल्या.

# मालमत्ता कर थकबाकीदारांनी घेतला अभय योजनेचा लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेने अभय योजना लागू केल्यापासून नऊ दिवसांमध्ये ५,७४४ मालमत्ताकर थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. योजनेचा लाभ घेत भरलेल्या मालमत्ता कराची रक्कम २० कोटी १५ लाख १२ हजार ५२७ रुपये एवढी आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ रोजी, रात्री १२ पर्यंत सुरू राहणार असून, अद्याप ज्या मालमत्ता धारकांचा मालमत्ताकर भरणे बाकी आहे, अशा थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत मालमत्ताकराची थकबाकी एकरकमी भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी १० मार्च २०२६ रोजी अभय योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक तसेच मोकळ्या जागांच्या मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरल्यास संबंधित मालमत्ताधारकांना विलंब शुल्कावर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५–२०२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी निर्दिष्ट कालावधीत एकरकमी भरणे आवश्यक असून, या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. अभय योजना लागू झाल्यापासून १० मार्च २०२६ रोजी, सकाळी १० पासून ते १८ मार्च २०२६ रोजी, दुपारी १२ पर्यंत नऊ दिवसांच्या काळात पाच हजार ७४४ मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेत रू. २० कोटी १५ लाख १२ हजार ५२७ इतकी रक्कम जमा केलेली आहे.



यामध्ये ऐरोली प्रभागातून ६२५ मालमत्ता धारकांनी ४६ लाख ४९ हजार ५१४ रुपये, बेलापूर प्रभागातून ५५३ मालमत्ताधारकांनी दोन कोटी ६१ लाख आठ हजार ७८१ रुपये, दिघा प्रभागातून २९७ मालमत्ताधारकांनी ४८ लाख ५७ हजार ९१८ रुपये, घणसोली प्रभागातून एक हजार २६० मालमत्ताधारकांनी दोन कोटी ८८ लाख ९७ हजार ८६८ रुपये, कोपरखैरणे प्रभागातून ७३७ मालमत्ताधारकांनी चार कोटी ४८ लाख ८० हजार ७३८ रुपये, नेरूळ प्रभागातून ८९९ मालमत्ताधारकांनी पाच कोटी ७० लाख चार हजार ७८८ रुपये, तुर्भे प्रभागातून ८९० मालमत्ताधारकांनी दोन कोटी ११ लाख ४८ हजार ५०१ रुपये आणि वाशी प्रभागातील ४८३ मालमत्ताधारकांनी एक कोटी ३९ लाख ६४ हजार ४१९ रुपये मालमत्ताकर भरला आहे.

करवसूली मोहीमेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून मोठ्या प्रमाणावर कर संकलन होत आहे. तथापि, काही मालमत्ताधारकांकडून अद्याप थकीत रकमेचा भरणा झालेला नसून, अशा मालमत्ताधारकांनी महानगरपालिकेच्या 'अभय योजनेचा लाभ घेऊन ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत मालमत्ताकर भरून विलंब शुल्कावर ५० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

### ऑनलाईन कर भरण्यास नागरिकांची मिळतेय पसंती

नवी मुंबई शहरातील मालमत्ता धारकांसाठी आठही विभाग कार्यालयांमध्ये कर संकलन केंद्रांत प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून, त्याचसोबत नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीनेही मालमत्ता कर भरण्याची व्यवस्था उपलब्ध आहे. या सुविधेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील ९ दिवसांत अभय योजनेचा लाभ घेऊन मालमत्ता कर भरलेल्या ५ हजार ७४४ मालमत्ताधारकांपैकी जवळपास ५५ टक्के म्हणजेच ३ हजार १३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाईन कर भरला आहे. तरी, अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी कर भरलेला नाही, त्यांनी महानगरपालिकेच्या www. nmmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन किंवा WhatsApp Chatbot ८२९१९२०५०४ द्वारे किंवा कर संकलन केंद्रात प्रत्यक्ष जाऊन आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन पालिकेने केले आहे.

# महापालिका मुख्यालयात शहीद दिनानिमित्त अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयात सोमवार, २३ मार्च रोजी थोर स्वातंत्र्यसैनिक भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या शहिद दिनानिमित त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, उपसचिव अक्षय कदम, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, महापालिका कर्मचारी उपस्थित होते.



# 'साहित्यिक ए.डी. पाटीलांनी साहित्याचा जागर मांडला'

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

ज्येष्ठ साहित्यिक तथा निवृत्त मुख्याध्यापक ए.डी.पाटील यांनी साहित्याचा जागर मांडला आहे, असे महत्त्वपूर्ण विचार साहित्यरत्न प्रा.एल बी. पाटील यांनी मांडले.

ज्येष्ठ साहित्यिक ए.डी. पाटील यांच्या लेखणीतून उतरलेल्या मला भावलेली व्यक्तिमत्वे व सारडे गाव आणि त्याचा भवताल या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते आपल्या भाषणातून बोलत होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान त्रिदल एज्युकेशन सोसायटी व सुदर्शन एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. सुरेश पाटील यांनी भूषविले होते.



प्रकाशन समारंभाला ज्येष्ठ साहित्यिका स्मिता वाजेकर, चेअरमन जीवन गावंड, कादंबरीकार चंद्रकांत मढवी, साहित्यिक सुधाकर पाटील, अॅड.के.एस. पाटील, इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक प्रकाश पाटील, इतिहास संशोधक के.एम. मढवी, खजिनदार प्रफुल्ल वेदक, उत्कर्ष समितीचे गोपाळ पाटील तसेच अन्य साहित्यिक मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष प्रा. सुरेश पाटील यांनी साहित्यिक ए.डी.पाटलांची साहित्य चळवळ प्रेरणा देणारी आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाचे खरे वास्तव मांडले असून, आपल्या पत्रावळ कादंबरीतून हलाखीच्या परिस्थितीत पत्रावळीच्या व्यवसायातून वडिलांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा केला. याचे वास्तव आपल्या पत्रावळ कादंबरीतून मांडले असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

दरम्यान, ज्येष्ठ साहित्यिका स्मिता वाजेकर यांनी पुस्तक परीक्षणातून मला भावलेली व्यक्तिमत्वे हे पुस्तक तालुक्यातील उतुंग व्यक्तिमत्त्वांसाठी मानाचे कोंदण व्हावे या तळमळीने ए डी पाटील यांनी या पुस्तकाची निर्मिती केली असून, येथील व्यक्तिमत्वांना एक नवे नाव मिळाले. एक वेगळी प्रतिष्ठा या पुस्तकाच्या माध्यमातून मिळाली. हे विशेष असल्याचे त्यांनी सांगितले.

रंजना केणी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कोकण मराठी साहित्य परिषद उरण व काव्य दरबार उरण यांच्यावतीने सत्कारमूर्ती तथा ज्येष्ठ लेखक ए डी पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रफुल्ल वेदक, मुख्याध्यापिका ए.ए.पाटील, निमंत्रक बी.के.भगत, एल.एन.भगत, सी.के.पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, संजीव पाटील, समता ठाकूर, मिनल माळी, लवेंद्र मोकल व शाळेच्या आजी–माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कचरावेचक महिलांची मुले रमली उड्डाण शिबिरात

**नवी मुंबई : बातमीदार**

स्त्री मुक्त संघटनेने कुष्ठरोग निवारण समिती नेरे पनवेल येथे २० व २१ मार्च रोजी कळवा, दिघा, रबाळे, इंदिरानगर, बोनसरी, नवशील व पनवेल येथील कचरावेचक महिलांच्या नववी ते महाविद्यालयातील ५० कुमारवयीन मुलांसाठी दोन दिवसीय 'उडान' शिबिराचे आयोजन केले होते.



पहिल्या दिवशी समुपदेशक अरमान सिंग व रिया भाटिया यांनी नेतृत्व गुण, आत्मविश्वास, नातेसंबंध, मैत्री व प्रेम या विषयावर मुलांशी संवाद करत अनेक खेळांमधून या गोष्टींचे महत्त्व विशद केले, मुलांनी आपले विचार मोकळेपणाने व्यक्त केले, परस्पर संवाद, विश्वास व टीम बांधणीचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळले, स्त्री पुरुष समानता या विषयावरील सत्र स्त्री मुक्ती संघटनेच्या विश्वस्त वृषाली मगदूम यांनी घेतले, मुला–मुलींची वेशभूषा, वेळेची बंधने, करिअर संधी, उच्च शिक्षण या अनेक मुद्द्यावर विद्यार्थ्यांशी चर्चा करत समाजात स्त्री पुरुष समानतेची गरज विशद केली.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या वंदना शिंदे यांनी दोन दिवस या निवासी शिबिरात राहून विद्यार्थ्यांना चळवळीची गाणी शिकवली, जादू टोणा ,उपास तापास, अंगात येणे, भानामती याविषयी भाष्य करत अनेक प्रयोग करून भोंदू बाबा सामान्य माणसाची कशी फसवणूक करतात हे विद्यार्थ्यांना सहभागी करून घेत सांगितले.

निळकंठ कोळी शिबिर प्रमुख यांनी कुष्ठरोग निवारण समितीतील अनेक प्रकल्पांची माहिती विद्यार्थ्यांना दिली, १२० एकर जागा असणाऱ्या या कुष्ठरोग निवारण समितीत कुष्ठरोग आश्रम, वृद्धाश्रम, विकलांग लोकांसाठी असणारे युनिट त्यांनी दाखवले, विद्यार्थ्यांनी आजी–आजोबांशी संवाद केला, सतरंजी, टॉवेल, पिशव्या या हातमाग युनिटला विद्यार्थ्यांनी भेट दिली, अन्वय व्यसनमुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलनचे कार्यकर्ते मनोहर तांडेल यांनी खगोलशास्त्र व मानवी जीवन यातील विसंगती पीपीटीच्या माध्यमातून मुलांना समजावून सांगितले.

कुंडली भविष्य, लग्न ठरवणे, ग्रह तारे यांचा अभ्यास अशा गोष्टीवर प्रकाश टाकत या विषयावरील माहिती चर्चेतून विशद केली, मुलांसाठी अभ्यासबाह्य गोष्टीचे भांडार खुले झाले. त्याचा पुढील जीवन जगण्यात त्यांना नक्कीच फायदा होणार आहे, आशा, सीमा, संगीता, दीपा, प्रियांका, विशाखा या कार्यकर्त्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# न्युईरा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक अॅडव्हान्स्ड नी क्लिनिक सुरू

**पनवेल : वार्ताहर**

गुडघेदुखी, संधिवात, सांध्यांचे आजार आणि चालताना वेदना होणे अशा समस्या दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वाशीतील न्युईरा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक अॅडव्हान्स्ड नी क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. गुडघेदुखी, वयोमानानुसार होणारी हाडांची झीज, क्रीडा दुखापती आणि जीवनशैलीमुळे होणाऱ्या सांध्यांच्या समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे क्लिनिक विशेष सुविधा उपलब्ध करून देणार आहे.



हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीत व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा, दुखापती आणि वाढते वय यामुळे गुडघ्यांचे आजार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. अनेकांना गुडघेदुखी, सूज, स्नायुंचा कडकपणा, चालताना किंवा जिने चढताना होणारा त्रास अशा समस्या जाणवतात. वेळीच उपचार न केल्यास या समस्या गंभीर रुप धारण करुन दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या क्लिनिकमध्ये वेळीच निदान, उपचार आणि उपचारानंतर घ्यावयाची काळजी यावर विशेष भर दिला जाणार आहे.

या क्लिनिकमध्ये तपासणीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध असून क्लिनिकल तपासणी, डिजिटल एक्स–रे, फिजिओथेरपी, ऑर्थोपेडिक सल्ला अशा सर्व सेवा पुरविल्या जाणार आहेत.

न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष व सीईओ डॉ. माताप्रसाद बी. गुप्ता यांनी सांगितले की, अॅडव्हान्स्ड नी क्लिनिकच्या माध्यमातून रुग्णांना वेदनामुक्त आणि सक्रिय जीवनाकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

# भाजप आगामी काळात स्वबळावर लढण्यास सक्षम -ॲड.महेश मोहिते

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपने स्वतःला अजमावले असून प्रत्येक निवडणुकीत भाजपची ताकद किती , असा प्रश्न उपस्थित केला जात होता, त्यास प्रतिउत्तर दिले आहे. गेल्या निवडणुकीत अपयश आले, परंतू कुर्डूस, मापगाव, चणेरा, बेलोशी, चौल व मुरूड आदी विधानसभा मतदारसंघातील गटामध्ये पन्नास हजार मते भाजपने मिळविली आहेत. त्यामुळे आगामी निवडणूक स्वबळावर लढण्यास भाजप सक्षम आहे, असे प्रतिपादन भाजप दक्षिण जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी चौल येथे दक्षिण मंडळ पदाधिकारी नियुक्ती पत्रक वाटप कार्यक्रमामध्ये पदाधिकारी व कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करताना केले.



भाजपचा अलिबाग तालुक्यातील दक्षिण मंडळ पदाधिकारी नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रम चौल मुखरी श्री गणेश मंदिर येथे सोमवार, २३ मार्च रोजी सायकांळी ५ वाजता घेण्यात आला. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, भाजप महिला जिल्हा मोर्चा अध्यक्ष चित्रा पाटील, ॲड. आस्वाद पाटील, उपाध्यक्ष संदीप घरत, माजी जिल्हा अध्यक्ष हेमंत दांडेकर, सतिश लेले, माणिक बळी, मंदाताई बळी, दक्षिण मंडळ प्रमुख अशोक वारगे, विश्वास जोशी, संकेत जोशी आदीची उपस्थिती व्यासपिठावर होती.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत चौल भाजपचे वतीने हेमंत दांडेकर, विश्वास जोशी, संकेत जोशी आदीचे हस्ते पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले. त्यानंतर उपस्थित दक्षिण मंडळ भाजप कार्यकर्त्यांना नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले यामध्ये अलिबाग दक्षिण मंडळ सरचिटणीस संकेत जोशी, सरचिटणीस समीर घरत, उपाध्यक्ष राकेश अवचटकर, उपाध्यक्ष एससी/एसटी गजानन पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर टिवळेकर, चिटणीस प्रतिभा प्रकाश भांजी, कोषाध्यक्ष शैलेश म्हात्रे, महिला सदस्य ममताबेन दिलिप पटेल, महिला सदस्य एससी/एसटी वैशाली झेंडेकर, महिला सदस्या मुग्धा विश्वास जोशी, महिला सदस्य एससी/एसटी बबिता संदिप खंडेराव, सदस्य गजानन झेडेंकर,सदस्य जगन ठाकूर, सदस्य रत्नदिप उदय खंडेराव, सदस्य पुजा किरण खंडेराव, सदस्य रूपाली प्रमोद बळी, सदस्य शलाका निलेश कोंडे, सदस्य प्रमोद बळीराम बळी, सदस्य उदय कृष्णा खंडेराव, सदस्य प्रज्वल किशोर गणतांडेल, सदस्य संदेश शिंदे, सदस्य संदेश पडवळ, सदसय सतिश म्हात्रे, सदस्य अजय नाईक, युवामोर्चा दक्षिण मंडळ उपाध्यक्ष विक्रम रविंद्र सुर्वे, सरचिटणीस जयेश नारायण साळावकर, सरचिटणीस रोहीत रविंद्र पाटील तसेच दक्षिण मंडळ शक्तीकेंद्र प्रमुख जगदीश कांबळे, मयुर झावरे, विश्वास जोशी, दिलिप पटेल, व सतिश लेले यांना पदाचे नियुक्ती पत्र उपस्थित मान्यवर ॲड. महेश मोहिते, चित्रा पाटील, ॲड.आस्वाद पाटील, मंदाताई बळी, संदिपभाई घरत यांचे हस्ते प्रदान करण्यात आली.

यावेळी उपस्थित भाजप दक्षिण मंडळ पदाधिकारांना मार्गदर्शन करताना जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा पाटील यांनी सर्व दक्षिण पदाधिकारांसह महिला पदाधिकारांची निवड करण्याचे मनोगत व्यक्त केले, जेणेकरून भाजप पदाधिकारी व कार्यकते यांची ताकद वाढेल व मतदार वाढीस कारणीभूत ठरेल असे म्हटले. प्रास्ताविक विश्वास जोशी व कार्यक्रमात उपस्थितांचे आभार हेमंत दांडेकर यांनी व्यक्त केले.

# काकळघर-शिरगाव रस्त्याचे भूमिपूजन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मांडळा कडून काकळघर मार्गे डोंगर भागातून जाणारा काकळघर-शिरगाव हा रस्ता नव्याने करण्यात येत असून या रस्ताचे कामाचे भूमिपूजन कार्यक्रम नुकताच झाला.

स्थानिक कार्यकर्त्याच्या मागणीने आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने दुर्लक्षीत असलेले काकळघर-शिरगाव हा घाट रस्ता नव्याने करण्यात येत आहे. या रस्त्याचे कामाचे भुमिपुजन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते सि.एम. ठाकूर, मुरूड शिवसेना उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, काकळघर ग्रामपंचायत सरपंच स्वस्तिक ठाकूर, सामाजीक कार्यकर्ते संदेश पाटील, नथुराम कांबळी, कैलास ठाकूर, सागर भोईर,चद्रकांत जाधव, शाखा प्रमुख विशाल दिवेकर, मुरूड कामगार सेना प्रणय शिर्के, जायपाटील, अमर केंद्रे आदीची उपस्थिती होती.

यावेळी जेष्ठ कार्यकर्ते सि.एम. ठाकूर, सामाजीक कार्यकर्ते संदेश पाटील यांचे हस्ते श्रीफळ वाढवून या रस्ता कामाचे भुमिपुजन करण्यात आले. या रस्ताचे पुर्ननिर्मितीने मांडळा ते काकळघर मार्गे शिरगाव अंतर फारच कमी वेळेचे होणार आहे, काकळघर मार्गे घाट रस्ताने पुढे गेल्यावर शिरगाव येथे जाता येते. त्यामुळे मांडळा व्हाया साळाव मार्गे शिरगाव या रस्ताने जाताना होत असलेल्या वेळेचा अपवेळ मांडळा पंचक्रोशीत प्रवासीवर्गाचा वाचणार आहे. तसेच अंतर कमी असल्याने वाहनाना सुध्दा फायदेशीर ठरणार आहे. या रस्तासाठी आमदार महेंद दळवी यांचे विशेष सहकार्य लाभले असून काकळघर ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांचे आभार मानले आहे.

# मानवी पावराचे नवोदय परीक्षेत यश



**तळा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा आनंदवाडीच्या शाळेतील मानवी लालसिंग पावरा ही विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत यशस्वी झाली आहे. ही ग्रामीण भागातील शाळा असून गरीब कुटुंबातील या विद्यार्थीनीने अभ्यास करून या परीक्षेत यश प्राप्त केले आहे.

या विद्यार्थीनीला तुकाराम दामले या शिक्षकांनी मार्गदर्शन केले तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता वारे यांचे नियोजन यामुळे हे यश प्राप्त झाले आहे. शाळेत गेल्या दोन वर्षांपासून स्पर्धा परीक्षेत या शाळेचे विद्यार्थी यश प्राप्त करत असल्याने.या गावच्या ग्रामस्थांचे सहकार्य मिळत असून ग्रामस्थांनी या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यशस्वी विद्यार्थीनीचे सत्कार केला आहे. यावेळी भानू मंचेकर, नगरसेवक नरेश सुर्वे, मुबीन वासकर, आयाजी जमदाडे, विजेश्री मंचेकर, अस्मिता वारे, तुकाराम दामले आदी उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०३/८१/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०३/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री./श्रीमती...................................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक ०१/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०३. दिनांक ०१/०४/२०२६ ची**
**विषयपत्रिका**
**विषय**

**१. मागील सर्वसाधरण सभा दिनांक ०६/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**२. निवडणुक**

१. श्री. प्रविण काळुराम पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर तौलनिक संख्याबळानुसार एका सदस्याची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती करणेबाबत.

**३. प्रश्नोत्तरे**

**४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**

१. श्री. शरद वसंतराव पाटील, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, यांचे नियुक्तीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

२. पनवेल महानगरपालिकेच्या ०२ डायलॅसीस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वापरण्यात येणाऱ्या मेडिकल गॅस सिलेंडरचे कंत्राटी तत्वावर Medical Gas Refilling करुन घेणेकरिता एजन्सीची नेमणुक करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविणे व त्याकरिता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

३. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना व बालकांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत रक्त पुरवठा व रक्त संक्रमण करणेस व खाजगी/स्वंयसेवी/शासकीय व अशासकीय/धर्मादाय संस्थेच्या रक्तपेढ्यामधुन रक्त पुरवठा करणेकामी Expression of Interest (EOI) मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "ड" मधील विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिका मालकीच्या सर्व सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षासाठी दुरुस्ती व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.

५. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे.

६. पनवेल महानगरपालिका मालकीचे अं.भु.क्र. १२२ प्रायमरी स्कूल व प्ले ग्राऊंड आरक्षित भुखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल या संस्थेस ३० वर्षे कालावधीकरीता लिज भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/ प्र.क्र.०३/८२/२६
महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- २४/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे वांगणी तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे महसूल अभिलेखात असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाच्या शेतजमिन मिळकती आहेत. सदर मिळकतींचे स्वामित्व (Title) हक्क तपासणेकामी खालील शेतजमीन मिळकतींची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे वांगणी तर्फे वाजे, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | गुंठा |
|---|---|---|---|---|
| संध्या प्रदीप वकील | २३ | — | ०-२०-०० पो.ख. ०-०३-८० **०-२३-८०** | २३.८० |
| | २८ | १ | ०-३३-०० पो.ख. ०-०२-०० **०-३५-००** | ३५.०० |
| | २८ | २ | ०-३७-२० पो.ख. ०-०३-०० **०-४०-२०** | ४०.२० |
| | २९ | १ | ०-२३-०० पो.ख. ०-०१-०० **०-२४-००** | २४.०० |
| | ३१ | ५/अ | २-५६-०० पो.ख. ०-४०-०० **२-९६-००** | २९६.०० |
| | ३१ | ६ | ०-२१-०० पो.ख. ०-०३-०० **०-२४-००** | २४.०० |
| | ३३ | — | ०-९४-०० पो.ख. ०-१०-०० **१-०४-००** | १०४.०० |
| | ३५ | १ | ०-३०-४० पो.ख. ०-०२-५० **०-३२-९०** | ३२.९० |
| | ३५ | ४ | ०-०८-०० पो.ख. ०-१०-०० **०-१८-००** | १८.०० |
| | ४२ | — | ०-१६-१० पो.ख. ०-००-८० **०-१६-९०** | १६.९० |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतींवर, वा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतींचे स्वामित्वाचा तपशील आमचे अशिलांस देऊ व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक**
**२४/०३/२०१६**

**सही/-**
**विजय भगत अॅन्ड असोशिएटस् (ॲडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट) शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email. vijaybhagat४३@gmail.com

## नावात बदल

माझे जुने नाव **पूर्वित दिगंबर जगदाळे राहणार (पत्ता) : बिल्डींग नं टी/ ५२ रुम नं २१४ प्रतिक्षा नगर सायन मुंबई पूर्व- ४०००२२** हे माझे जुने नाव असून मी गॅझेट केले आहे. गॅझेट नं एम २५४६९१८२ व माझे आताचे नाव हेतांश दिंगबर जगदाळे असे बदलले असून, या पुढे मी हेतांश दिगंबर जगदाळे या नवीन नावाने ओळखला जाईन.

**सही/-**
**नवीन नाव**
**हेतांश दिगंबर जगदाळे**

## जाहीर सावधान नोटीस

आमचे अशिल श्रीमती आनुबाई बजरंग गायकर आणि अन्य कायदेशीर वारसदारांचे वतीने, तमाम जनतेस सदरहू नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की मौजे डोलघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील पुढिल वर्णनाची मिळकत कागदोपत्री कुणाचेही नाव असले तरी वर्षानुवर्षे आमचे अशिलांचेच ताबेकबजात आणि वहिवाटीत आहे. सबब या वहिवाटी संदर्भात प्रस्तुत जाहीर सावधान नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-डोलघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर.पॉ | आकार रक्कम |
|---|---|---|---|
| २५ | ३ | ०-०८-८० | १-०६ |

सदर मिळकत मागिल ७०-७५ वर्षांपासून आमच्या अशिलांच्या ताबेकब्जात आणि वहिवाटीत आहे. या मिळकतीच्या कसवणुकीतून त्यांचे पूर्वज आणि आता ते स्वतः भातपिकाचे उत्पन्न मिळवित आहेत. पिढ्यानपिढ्या चालू राहिलेला सदरचा ताबाकब्जा आणि वहिवाट आजपर्यंत अखंड, विनाअडथळा, विनाहरकत राहिला असून आता हा शांततामय ताबा प्रतिकूल ताबेकब्जाने मालकी हक्कात रुपांतरीत झाला आहे.

सदरची मिळकत पूर्वपुरुष जोमा खंडू कोळी आणि त्यांची पत्नी धुरपी जोमा कोळी यांच्या कसवणुकीत होती. त्यांच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारसदारांमध्ये वाटणी झाली व मिळकतीचा ताबाकब्जा बजरंग जोमा गायकर यांचेकडे आला. यास आजपर्यंत कधीही, कोणीही, कुठल्याही स्वरूपाची हरकत उपस्थित केली नाही. सातत्याने व निर्वेधपणे राहिलेली मिळकतीमधील वहिवाट आता कायदेशीर बनली असून सदर मिळकत प्रतिकूल ताबेकब्जाने (Adverse Possession) आमच्या अशिलांच्या मालकी हक्कात आलेली आहे.

७/१२ उताऱ्यावरील नोंदी केवळ महसुली कामकाजाकरिता असतात. नोंदीद्वारे मालकी हक्क सिद्ध होत नाही. मिळकतीचा खुला ताबा महत्वाचा असतो. स्वतःच्या न्याय्य हक्काबाबत आमचे अशिल न्यायालयीन प्रक्रियेचा अवलंब करणार आहेत. सबब आमचे अशिल सर्वांना जाहिररित्या सावध करीत आहेत की, आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे उलट कब्जाने मालक झाले असताना सात/बारा उताऱ्यावरील नोंदीचा गैरफायदा घेत कुणी आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कास बाधा आणू नये. तसेच कुणीही सदरहू मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये. स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर कोणेही या मिळकतीबाबत आमच्या अशिलांच्या कायदेशीर हितसंबंधास बाधा आण्ण्याचा प्रसत्न केल्यास, अशी गैरकृती आमच्या अशिलांवर बंधनकारक नसेल. त्याचे परिणामास आणि आर्थीक तोषीसीस आमचे अशिल जबाबदार नसतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण -पनवेल,**
**दिनांक** - २५/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. माधुरी राजन थळकर**
**ऑफिसः- शॉप क्र. १, तळ मजला, ९८/२, साई प्रसाद सी.एच.एस. स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल- ४१०२०६**
**मो. क्र. ८९२९५५००१/८१०४६४०३३२**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**शुद्धिपत्रक**

**ई निविदा सूचना क्र. ८७/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १८/०३/२०२६ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदूस्तान टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक हमारा महानगर, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धता, कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणे, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत शुद्धिपत्रक देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम रुपये कोटी |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक चवदार तळे, महाड येथे ओझोनायझेशन आधारित जलशुद्धीकरण प्रणाली पुरविणे व बसविणे आणि सभोवतालच्या परिसराचा विकास व सुशोभीकरण करणे. | ₹ ४२,५३,६४,७५१.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २५/०३/२०२६ ते दिनांक ०७/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३०/०३/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०१/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# यश दयाल आयपीएलमधून बाहेर

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



बलात्काराचा आरोप असलेला वेगवान गोलंदाज यश दयाल आयपीएल २०२६च्या हंगामात आमच्या संघातून खेळणार नाही, असे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फ्रेंचायजीने स्पष्ट केले आहे. लिलावापूर्वी संघातील कायम असणाऱ्या खेळाडूंना यादी जाहीर झाली होती, तेव्हा आरसीबीने दयालला कायम ठेवल्यामुळे मोठा गदारोळ झाला होता, मात्र सराव सत्रांमध्ये त्याची अनुपस्थिती पाहता तो संघात नसल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. आता आरसीबीने स्पष्ट केले आहे की, "वैयक्तिक कारणास्तव" तो यावर्षी खेळणार नाही.

आरसीबीचे डायरेक्टर ऑफ क्रिकेट मो बोबॅट यांनी स्पष्ट केले की, यश दयाल अद्याप फ्रँचायझीसोबत कराराबद्ध असला तरी तो आगामी हंगामात संघाचा भाग असणार नाही. माध्यमांशी बोलताना बोबॅट म्हणाले, यश सध्या एका कठीण वैयक्तिक परिस्थितीतून जात आहे. तो अजूनही आमच्या करारात आहे, पण या हंगामात तो आमच्यासोबत नसेल.

२०२५च्या आयपीएलमध्ये आरसीबीला विजेतेपद मिळवून देण्यात यश दयालने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याने संपूर्ण हंगामात १३ बळी घेतले होते, मात्र गेल्या वर्षीच्या फायनलपासून तो क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. त्याच्यावर सध्या कायदेशीर कारवाई सुरू आहे.

दरम्यान, आरसीबीच्या भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पांड्या यांच्या साथीला यश दयालची डावखुरी वेगवान गोलंदाजी हा संघासाठी जमेची बाजू होती. तो करारात असल्याने आरसीबीला त्याच्या जागी दुसरा बदली खेळाडू घेता येणार नाही. आता भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड, नुवान थुशारा, जेकब डफी आणि रसिक सलाम यांसारख्या खेळाडूंवर गोलंदाजीची मदार असेल.

क्रिकेटपटू यश दयालवर जुलै २०२५मध्ये उत्तर प्रदेशमधील गाझियाबादच्या इंदिरापुरम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. महिलेने आरोप केला आहे की, लग्नाचे आमिष दाखवून पाच वर्षांच्या संबंधात दयालने तिचे शारीरिक आणि मानसिक शोषण केले. यानंतर जयपूरमध्ये पोक्सो कायद्यांतर्गत दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. एका अल्पवयीन मुलीने आरोप केला आहे की, २०२३पासून दयालने तिचे अनेकदा लैंगिक शोषण केले. २०२५च्या आयपीएल दरम्यान एका हॉटेलमध्ये तिच्या करिअरमध्ये मदत करण्याचे आश्वासन देऊन त्याने अत्याचार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने गाझियाबाद प्रकरणात त्याच्या अटकेला स्थगिती दिली होती. डिसेंबर २०२५मध्ये जयपूरच्या पोक्सो न्यायालयाने त्याचा आगाऊ जामीन अर्ज फेटाळून लावला होता. पुराव्यांचे गांभीर्य लक्षात घेता तपास अद्याप सुरू आहे.

# जेएनपीएमध्ये अखिल भारतीय बंदरांची कॅरम स्पर्धा

**उरण : प्रतिनिधी**



अखिल भारतीय बंदरांची ४४वी कॅरम स्पर्धा जेएनपीएच्या बहुउद्देशीय सभागृहात २३ ते २५ मार्चदरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या कॅरम स्पर्धेत देशभरातील नऊ बंदरांतून ९५ स्पर्धक सहभागी झाले असून यामध्ये १५ महिला स्पर्धकांचाही समावेश आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेएनपीए प्रशासनाच्या वरिष्ठ प्रबंधक, सेक्रेटरी तथा जेएनपीए खेल परिषदेच्या अध्यक्ष मनिषा जाधव, कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील, दिनेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

स्पर्धा सिंगल, डबल व टीम इव्हेंट अशा विविध प्रकारांमध्ये खेळली जात आहे. विशेष म्हणजे यावर्षी पहिल्यांदाच महिलांसाठी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये पाच बंदरातील पाच महिला टीममधील १५ महिला सहभागी झाल्या आहेत, असे जेएनपीए खेल परिषदेचे महासचिव कल्पित म्हात्रे यांनी सांगितले.

# महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने मुख्यालयाजवळील क्रीडांगणात २३, २४ व २५ मार्च २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात झाले. ४० वर्षावरील क्रिकेट खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध व्हावे व शारीरिक तंदुरूस्तीबाबत त्यांच्या मनात असलेली आरोग्य जागरूकता वाढावी यासाठी मागील १० वर्षापासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

उद्घाटन समारंभास महापालिकेच्या क्रीडा, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीष म्हात्रे, क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, ४०+ क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मास्टर प्रदीप पाटील, उपाध्यक्ष नरेश गौरी, सचिव एल.डी. पाटील, विकास मोकल, मनोज म्हात्रे, बळीराम पाटील, भालचंद्र दळवी, बाळकृष्ण बंदरे आदी उपस्थित होते.

स्पर्धत नवी मुंबई महापालिका क्षेत्राच्या ग्रामीण भागातील ३३ संघ तसेच शहरी भागातील २५ असे एकूण ५८ संघ सहभागी झाले आहेत. यावेळी पावणे गाव व ऐरोली गाव या संघांमध्ये झालेल्या शुभारंभाच्या सामन्यात पावणे गाव संघाने विजय संपादन केला.

अंतिम फेरीचे सामने सेक्टर ३ सीबीडी बेलापूर येथील राजीव गांधी क्रीडा संकुलात होणार आहेत. विशेष म्हणजे हे सामने क्रीडा संकुलात नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या प्रखर विद्युत व्यवस्थेत प्रकाशझोतात खेळले जातील.

## स्पेन्सर जॉन्सन 'सीएसके'त दाखल

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने यंदाच्या हंगामासाठी दुखापतग्रस्त ऑस्ट्रेलियन गोलंदाज नॅथन एलिसच्या जागी बदली खेळाडू शोधला आहे. सीएसके फ्रँचायझी संघाने ऑस्ट्रेलियन जलदगती गोलंदाज स्पेन्सर जॉन्सन याला आपल्या संघात दाखल करून घेतले आहे.

सीएसकेत येण्यापूर्वी तो गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाचा भाग राहिला आहे. दोन फ्रँचायझीकडून मिळून त्याने आतापर्यंत नऊ सामन्यात पाच विकेट्स घेतल्या आहेत. जॉन्सन हा ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीय संघाकडूनही खेळला आहे. १३ आंतरराष्ट्रीय सामन्यात (पाच वनडे आणि आठ टी-२०) त्याच्या खात्यात १८ विकेट्स जमा आहेत.

# सॅम करनच्या जागी राजस्थानच्या ताफ्यात दसुन शनाकाची एन्ट्री!

**जयपूर : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२६चा थरार सुरू होण्यापूर्वी दुखापतग्रस्त खेळाडूंनी अनेक संघांची डोकेदुखी वाढवली आहे. यामध्ये राजस्थान रॉयल्सलाही मोठा धक्का बसला होता. इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करन दुखापतीमुळे या हंगामातून बाहेर पडला आहे, मात्र राजस्थान रॉयल्सने तातडीने पावले उचलत त्याच्या जागी श्रीलंकेच्या अनुभवी खेळाडूची निवड करून आपली बाजू सावरली आहे.

राजस्थान रॉयल्सने आगामी आयपीएलसाठी सॅम करनचा पर्याय म्हणून श्रीलंकेचा माजी कर्णधार आणि अनुभवी अष्टपैलू दसुन शनाका याला संघात स्थान दिले आहे. राजस्थान फ्रँचायझीने शनाकाला दोन कोटी रुपयांच्या बोलीसह आपल्या ताफ्यात सहभागी केले आहे. संघाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

आयपीएल २०२६चा बिगुल २८ मार्चपासून वाजणार असला, तरी राजस्थान रॉयल्स आपल्या मोहिमेची सुरुवात ३० मार्च रोजी करणार आहे. गुवाहाटी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या सामन्यात राजस्थानसमोर पाच वेळच्या चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्सचे कडवे आव्हान असेल. २००८मध्ये पहिल्याच हंगामात विजेतेपद पटकावल्यानंतर राजस्थानला अद्याप दुसऱ्यांदा चषक उंचावता आलेला नाही. युवा रियान परागच्या नेतृत्वाखाली यंदा विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याचे राजस्थानचे लक्ष्य असेल.

### प्रदीर्घ आंतरराष्ट्रीय अनुभव

दसुन शनाकाची आंतरराष्ट्रीय कारकीर्द अत्यंत प्रभावी राहिली आहे. त्याने श्रीलंकेसाठी सहा कसोटी, ७१ एकदिवसीय आणि १३१ टी-२० सामने खेळले आहेत. या प्रवासात त्याने ३३५०पेक्षा अधिक धावा आणि ८६ बळी आपल्या नावे केले आहेत. आयपीएलचा विचार करता शनाकाने यापूर्वी गुजरात टायटन्सचे प्रतिनिधित्व केले असल्याने त्याला भारतीय खेळपट्ट्यांचा आणि लीगच्या वातावरणाचा चांगला अनुभव आहे. सॅम करनची उणीव भरून काढण्यासाठी राजस्थानने एका अनुभवी आणि संतुलित खेळाडूला पसंती दिल्याचे बोलले जात आहे.

# कोलकाता नाईट रायडर्सला धक्का!

**कोलकाता : वृत्तंस्था**



आयपीएल स्पर्धा सुरू व्हायला अवघे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना सनरायझर्स हैदराबाद संघाविरूद्ध होणार आहे, तर दुसरा सामना पाच वेळचा चॅम्पियन मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स या दोन्ही संघांमध्ये होणार आहे. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्याआधी कोलकाता संघाला मोठा धक्का बसला आहे. संघातील प्रमुख गोलंदाज आकाश दीप दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

आकाश दीप दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर होणे हा कोलकाता नाईट रायडर्सला बसणारा आणखी एक मोठा धक्का आहे, कारण संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज हर्षित राणा दुखापतग्रस्त आहे. त्यामुळे तो या स्पर्धेत खेळण्याची शक्यता खूप कमी आहे. आयपीएल स्पर्धेसाठी झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये कोलकाताने आकाश दीपवर एक कोटींची बोली लावून आपल्या संघात स्थान दिले होते. आकाश दीप संघात आल्याने संघाचे वेगवान गोलंदाजी आक्रमण

### प्रमुख गोलंदाज आकाश दीप दुखापतीमुळे आयपीएलमधून 'आऊट'

मजबूत झाले होते, पण आता तो ही स्पर्धा खेळू शकणार नाहीये.

वृत्तानुसार आकाश दीप हा लंबर स्ट्रेस इन्श्यूरीने त्रस्त असल्याची माहिती समोर येत आहे. सध्या तो बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये आहे. कोलकाता नाईट रायडर्सने इडन गार्डन्सच्या मैदानावर सराव सुरू केला आहे, पण आकाश दीप या सराव सत्रात सहभाग घेऊ शकला नव्हता. कोलकाता नाईट रायडर्स संघातील प्रमुख खेळाडू दुखापतीमुळे संघाबाहेर होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी हर्षित राणादेखील दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर झाला आहे. यासह संघातील आणखी एख प्रमुख वेगवान गोलंदाज मथीशा पथिराना अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे तो स्पर्धेतील सुरूवातीच्या सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे.

सध्या कोलकाता नाईट रायडर्सकडे वेगवान गोलंदाज म्हणून उमरान मलिक, कार्तिक त्यागी आणि वैभव अरोरासारखे वेगवान गोलंदाज आहेत. आता आकाश दीप स्पर्धेतून बाहेर पडल्यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघ त्याच्या बदली खेळाडूच्या शोधात आहे. माध्यमातील वृत्तानुसार नवदीप सैनी, सिमरजीत सिंग आणि आकाश मधवालसारखे खेळाडू शर्यतीत आहेत.

## 'एसआरएच'ने डेविड पेनवर लावला कोट्यवधींचा डाव

**हैदराबाद : वृत्तसमस्था**


सनरायझर्स हैदराबादच्या संघाने मिनी लिलावात ऑस्ट्रेलियन जॅक एडवर्ड्सला तीन कोटी रुपये मोजून आपल्या ताफ्यात घेतले होते, पण तो दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला. आता इंज्युरी रिप्लेसमेंटच्या रूपात काव्या मारनच्या संघाने इंग्लंडच्या जलदगती गोलंदाज डेविड पेन याच्यावर कोट्यवधींचा डाव लावला आहे. १.५ कोटी रुपयांसह या गोलंदाजाला हैदराबाद संघाने करारबद्ध केले आहे.

डेविड ॲलन पेन हा इंग्लंडचा डावखुरा मध्यम-जलदगती गोलंदाज आहे. त्याने २००९मध्ये ग्लॉस्टरशायर काउंटी क्रिकेट क्लबकडून व्यावसायिक क्रिकेटमध्ये पदार्पण केले. इंग्लंडच्या अंडर-१९ संघाचे टेस्ट आणि वनडे या दोन्ही प्रकारांत प्रतिनिधित्व केले असून २०११०च्या अंडर-१९ क्रिकेट विश्वचषकासाठीही त्याची निवड झाली होती.

३५ वर्षीय पेनने इंग्लंडसाठी एक वनडे सामना खेळला आहे. त्याच्याकडे टी-२० क्रिकेटचा मोठा अनुभव असून २३३ टी-२० सामन्यांत त्याच्या खात्यात एकूण ३०४ विकेट्स जमा आहेत.

# अक्षर पटेल आयपीएलच्या 'इम्पॅक्ट प्लेयर' नियमावर नाराज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयपीएलसाठी दिल्ली कॅपिटल्स संघात मिचेल स्टार्कच्या सहभागाबाबत अनिश्चितता कायम आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने अद्याप त्याला ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. फ्रँचायझीला आशा आहे की १ एप्रिल रोजी लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सलामीच्या सामन्यापूर्वी तो संघात असेल.

दरम्यान, दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने आयपीएलच्या 'इम्पॅक्ट प्लेयर' नियमावर नाराजी व्यक्त केली आहे. त्याने सांगितले की, हा नियम अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या भूमिकेला मर्यादित करतो. तो म्हणाला, मी एक अष्टपैलू क्रिकेटपटू आहे, त्यामुळे मला हा नियम आवडत नाही. पूर्वी संघ अशा क्रिकेटपटूंची निवड करायचा जे फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही करू शकत होते, पण आता संघ वेगवेगळ्या विशेषज्ञ क्रिकेटपटूंना प्राधान्य देतो, मात्र त्याने हेदेखील मान्य केले की नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.

मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी म्हटले की, ते क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या सतत संपर्कात आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, स्टार्क अलीकडे गोलंदाजी करत आहे, पण जोपर्यंत क्रिकेट ऑस्ट्रेलिया त्याला पूर्णपणे तंदुरूस्त घोषित करत नाही, तोपर्यंत फ्रँचायझी काहीही करू शकत नाही.

# बीसीसीआयचे नवे नियम चर्चेत


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने आयपीएल २०२६च्या हंगामासाठी सर्व संघांना काही नियमावली घालून दिली आहे. हे नियम सराव सत्र, प्रवास आणि सामन्यादिवशी संघांनी कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी करू नयेत यासाठी आहेत. याबाबतची नोट संघ व्यवस्थापकांना पाठवण्यात आली आहे.

नव्या नियमांनुसार सरावावेळी एका संघाला दोन नेट्स पुरवले जातील तसेच मख्य विकेट स्क्वेअरवर वन साईड विकेट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वानखेडेवर जर दोन्ही संघ एकाचवेळी सराव करणार असतील, तर प्रत्येक संघाला दोन खेळपट्ट्या पुरवल्या जातील.

जर एखाद्या संघाचा सराव लवकर संपला तर त्यांची खेळपट्टी दुसऱ्या संघाला वापरता येणार नाही. सामन्यादिवशी मुख्य खेळपट्टीच्या चौकोनात फिटनेस टेस्ट आयोजित करण्यास मनाई असेल. सरावाच्या दिवशी संघातील खेळाडूंना स्टेडियममध्ये टीम बसमधूनच यावे लागणार आहे. दोन ग्रुप केले असले तरी टीम बसचाच वापर करावा लागेल. खेळाडू व त्यांचे कुटुंबीय यांनी वेगवेगळाच प्रवास केला पाहिजे. कुटुंबीय व खेळाडू हे वेगळ्या वाहनाने प्रवास करू शकतात अन् सराव सत्र हॉस्पिटॅलिटी एरियातून पाहू शकतात.

खेळाडूंना एलईडी बोर्ड्सवर बॉल मारण्यास मनाई असेल. त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या हिटिंग नेट्सचाच वापर करायचा आहे. खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ यांना एलईडी समोर बसता येणार नाही. त्यांनी राखीव खेळाडूंसाठी ठरवून दिलेल्या बसण्याच्या जागेवरच बसायचे आहे. खेळाडूने ऑरेंज आणि पर्पल कॅप घालणे बंधनकारक असेल. जर ते पूर्णवेळ घालणार नसले तर निदान त्यांनी पहिले दोन ओव्हर ही कॅप घालणे बंधनकारक असेल, जेणेकरून ब्रॉडकास्टर्सना त्यांना शूट करता येईल. पोस्ट मॅच प्रेझेंटेशनमध्ये स्लीव्ह लेस जर्सी आणि स्लीपर घालण्यावर बंदी घालण्यात आली आहे. पहिल्या नियम उल्लंघनावर वॉर्निंग आणि दुसऱ्यावेळी आर्थिक दंड ठोठावण्यात येणार आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com